श्री

यूरोपच्या प्रवासाचें सिंहावलोकन.

लेखक

रामचंद्र शामराव पाटील माने,

बी. ए., एलएल. बी.,

मेंबर ऑफ धि सांशियालॉजिकल सोसायटी,

फेलो ऑफ धि रॉयल एकॉनामिक सोसायटी, लंडन.

सन १८२०.

किंमत ८ आणे.

श्री.

यूरोपच्या प्रवासाचें सिंहावलोकन.

लेखक

रामचंद्र शामराव पाटील माने,
बी. ए. एल्‌एल्. बी,
मेंबर ऑफ धि सोशियालॉजिकल सोसायटी,
फेलो ऑफ धि रॉयल एकॉनमिक सोसायटी, लंडन.

सन १९२०.

किंमत ८ आणे.

हें पुस्तक रा. भ. ब. पाळेकर यांनीं लेखक रा. रा. शा. पाटील माने यांच्याकरितां बडोदें येथें 'जागृति प्रिंटिंग प्रेस'मध्यें छापिलें.
ता. १-११-१९२०.

श्री.

अर्पणपत्रिका.

श्रीमंत सरकार

सयाजीराव महाराज गायकवाड

सेनाखासखेल समशेर बहादूर,

यांचेठायीं वसत असलेल्या नीतिमत्ता, सौजन्य, प्रजा-
कल्याणतत्परता, विद्यावृद्धीविषयीं आत्यंतिक कळकळ
इत्यादि बहुमोल गुणांच्या आदरास्तव

हें छोटें प्रवासवृत्त

श्रीमंतांच्या परवानगीनें त्यांचे चरणीं अत्यंत
नम्रतापूर्वक अर्पण केलें आहे.

श्रीमंतांचा नम्र सेवक,

रामचंद्र शामराव पाटील माने.

प्रस्तावना.

ह्या लहानशा पुस्तकास प्रस्तावनेदाखल दोन शब्द लिहिण्यास आह्मांस फार आनंद वाटत आहे. एका अर्थी हें पुस्तक आमच्याच सूचनेचें फळ होय.

यूरोपच्या प्रवासाचें वृत्त ह्मणजे परमोच्चपदास पोहोंचलेली तिकडील भौतिक सुधारणा, त्या लोकांनीं निर्माण केलेलीं सुखाचीं अनेक साधनें, त्यांच्या ख्याली-खुशाली व रमणीय रमणींचे विलास वगैरे गोष्टींनीं युक्त व चित्ताकर्षक वर्णन, अशी साधारण समजूत आहे. त्या दृष्टीनें कोणीं हें पुस्तक उघडल्यास त्यास तसें कांहीं आढळणार नाहीं. रा. माने पाटील हे एक विद्या-विनयसंपन्न तरुण गृहस्थ असून आपली विद्या पूर्ण कर-ण्याकरितां हे विलायतेस गेले होते; व आपल्या विद्यार्थी दशेस साजतील अशाच गोष्टींविषयीं त्यांनीं या पुस्तकांत आपले विचार नमूद केले आहेत. असें जरी आहे, तरी कर्त्याच्या सहृदयत्वास व कवित्वास उद्दीपित करणारे

यूरोपांतील देखावे पाहून त्यांची कल्पनाशक्ति आपले पंख उभारतेशी दिसते; परंतु पुस्तककर्त्यांनें तीस आंवरून धरून कोठेंही भरारी मारूं दिली नाहीं.

डेन्मार्क वगैरे देशांतील शेती व तदनुषंगिक इतर औद्योगिक बाबींसंबंधीं वर्णन फार उपयुक्त परंतु अगदींच त्रोटक आहे. ह्या विषयासंबंधानें विस्तृत लेख लिहून आपल्या ह्या देवमातृक देशाला ते मदत करीतील, अशी आह्मांस आशा आहे. तसें होईपर्यंत कर्त्याच्या भावीग्रंथकुसुमनिर्मितीची ही आद्यकलिका ह्मणून हें लहानसें पुस्तक लोकादरास पात्र होईल, असा आह्मांस भरंवसा आहे.

बडोदें.
ता. १–११–२०. } **गुणाजीराव निंबाळकर.**

अनुक्रमणिका.

श्री.

यूरोपच्या प्रवासाचें सिंहावलोकन.

प्रकरण १ लें.

विलायतेस प्रयाण.

पाश्चात्य देश कालचक्रनियमाला अनुसरून आजकाल सर्वतोपरि उन्नतीच्या शिखरावर जाऊन पोंहोंचले असल्यामुळें, पौर्वात्य देशांतील साधारण सुशिक्षित अथवा शिक्षित मनुष्याच्या मनामध्येंही हे देश पाहण्याची इच्छा उत्पन्न होणें साहजिक आहे. प्रवासाच्या साधनांची फारच अनुकूलता, परदेशगमनाविरुद्ध आतांपर्यंत चालत आलेल्या प्रतिगामी विचारांची शिथिलता, विसाव्या शतकामध्यें सर्व जगभर विचार, आचार वगैरेंमध्यें दिसून येणारी क्रांति वगैरे अनेक अनुकूल परिस्थितींमुळें, द्रव्याच्या अनुकूलतेशिवायची दुसरी कोणतीही अडचण आज राहि-

लेली नाहीं. ज्यांची सांपत्तिक स्थिति चांगली किंवा अन्यप्रकारें ज्यांना पैशाची सवड करतां आली अशा कित्येक हिंदी बंधूंनीं पाश्चात्य देशामध्यें प्रवास करून पौर्वात्य आणि पाश्चात्य देशामध्यें राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक वगैरे सर्वत्र बाबतींत किती मोठें अंतर आहे, त्यासंबंधाचे आपले विचार पुस्तकरूपानें, व्याख्यानद्वारा अथवा वर्तमानपत्रांतून लेख लिहून जनतेपुढें मांडून जनसेवा आजपर्यंत केली, ही आनंदाची गोष्ट होय. परदेशगमनाची जी अमूल्य संधि मला मिळाली, त्या संधीच्या योगानें जें अल्पस्वल्प ज्ञान व माहिती मला मिळवितां आली, ती माहिती देशबांधवांपुढें यथाशक्ति ठेऊन त्यांची सेवा करण्याचें हें धाष्टर्य मी प्रथमच करीत आहें, त्याचा परामर्श हंसक्षीर न्यायानें घेणें सूज्ञ बन्धुजनांवरच अवलंबून आहे. गुर्जरदेशाधिपति पुण्यश्लोक श्रीमंत गायकवाड सरकार महाराज साहेब यांच्या कृपेनें देशपर्यटन करण्याची मला संधि मिळाली, त्याबद्दल श्रीमंतांचा मी कायमचा ऋणी राहीन एवढेंच म्हणून माझें कर्तव्य संपलें असें होत नाहीं. परदेशगमनासाठीं श्रीमंत सरकारांची जी

आज्ञा झाली, तिच्या शेवटच्या भागामध्यें " मि. माने पाटील पोतानो अभ्यासक्रम पुरो करी पोताना ज्ञाननो अनुभव राज्यने आपशे एवी आशा राखवामां आवे छे. " म्हणजे " माने पाटील हे स्वतःचा अभ्यासक्रम पुरा करून मिळविलेल्या ज्ञानाचा फायदा राज्यास उपयोगी अशा कामांमध्यें करतील, अशी आशा बाळगण्यांत येत आहे " हे शब्द असल्यामुळें, ह्या शब्दांचा परिणाम माझ्या मनावर इतका झाला कीं, हे शब्द डोळ्यांपुढें वेदवाक्याप्रमाणें किंवा आप्तवाक्याप्रमाणें प्रमाणभूत एकसारखे दिसत राहून, त्या शब्दांनीं लादलेली जबाबदारी यशस्वी रीतीनें पार पाडण्याची जीवापाड मेहनत मी केली आहे. श्रीमंत सरकारांनीं प्रदर्शित केलेल्या इच्छेनुसार राज्य आणि प्रजाजनांना अनुकूल अशी कांहीं तरी कृत्यें माझ्या हातून जेव्हां होतील, तेव्हांच माझ्यावरील जबाबदारी पार पडून मी माझें कर्त्तव्य पूर्णपणें अथवा अंशतः तरी बजाविलें, असें होईल. हें कर्त्तव्य बजाविण्यास सामर्थ्य देणारा श्री जगन्नियन्ता परमेश्वर आहे. तो जगचालक श्रीमंत महाराज साहेबांना सहकुटुंब संपूर्ण आयु-

रारोग्य देवो, अशी त्याच्या चरणारविंदीं प्रार्थना करून मी थोडक्यांत हें प्रवासवृत्त लिहिण्यास सुरुवात करितों.

पी. अँड ओ. कंपनीची करमाला मेलबोट मुंबईहून ता. ४ आक्टोबर १९१९ या दिवशीं निघणार होती. त्या बोटीमध्यें आमच्याकरितां जागा नक्की करून तिकीट खरेदी केल्याबद्दल विद्याखात्याकडून नऊ दिवस आगाऊ आम्हांला तारेनें खबर मिळाली. विलायतसारखा लांबचा प्रवास करावयाचा होता. फक्त आठ दिवसांचाच अवधि मिळाल्यानें आप्तस्वकीय, स्नेही वगैरेंना भेटावयास मुळींच अवधि उरला न्हता. कित्येक मित्रमंडळींकडून मिळालेल्या माहितीप्रमाणें कपडेलत्ते वगैरे मुंबईस जाऊन शिववून तयार करून घेतले. आप्तस्वकीय व मित्रमंडळींपैकीं, वेळ नसल्यामुळें थोडक्यांनाच भेटण्याचें झालें. आठ दिवस एकसारखा प्रवास करून आम्हीं थकून गेलों होतों परंतु विलायतेस जाण्याच्या उत्कंठेमुळें मनास एक प्रकारचा उल्हासच वाटत होता. विजयादशमीच्या शुभमंगल मुहूर्तावर ता. ४ आक्टोबर १९१९ शनिवारीं दोनप्रहरीं आम्हीं मुंबई बंदरीं बॅलर्ड पीयरवर जाऊन दाखल झालों.

बरोबर माझे स्नेही रा. मनमोहनराय हुकमतराय देसाई हेही होते. आम्हां दोघांना अध्ययनाकरितां पाठविण्यांत आलें होतें. पीयरवर आप्तस्वकीय आणि स्नेही मंडळी आमची महायात्रा सुखकारक व्हावी म्हणून शुकमंगलद्योतक पुष्पहार, नारिकेलफल इत्यादि घेऊन आम्हांस निरोप देण्याकरितां आनंदानें उभे होते. माझे परममित्र रा. रावसाहेब दाजीबा देशमुख व रा. रामराव परभोजी पाटील हीं मंडळी माझ्या बरोबरच होती. सद्गदित कंठानें आप्तस्वकीय व स्नेही मंडळींची रजा घेऊन, डॉक्टर तपासणी आणि पासपोर्ट तपासणी झाल्यावर, आम्हीं करमाला मेलबोटवर चढलों. आप्तस्वकीय, स्नेही, रा. मणीभाई देसाई व रा. डाह्याभाई देसाई वगैरे पीयरवर उभे होते. त्या सर्वांच्या मुखचर्या प्रफुल्लित दिसत होत्या. तरी आमच्या वियोगामुळें होणाऱ्या दुःखानें त्यांच्या चेहऱ्यावर थोडीशी खिन्नताही दिसत होती. वरकांति हास्यमुख दाखविण्याचा ही मंडळी प्रयत्न करीत होती; तथापि कित्येकांच्या नेत्रांतून अश्रुबिंदु निघालेले स्पष्ट दिसत होते. वियोगदुःखापासून होणाऱ्या वेदना सहन करणें मानवीस्वभा-

वाला फारच कठीण पडतें, तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें आमच्या मनाची स्थिति झाली असल्यास नवल नाहीं. आप्तस्वकीय व स्नेही यांच्या खऱ्या प्रेमाची किंमत अशा वेळीं बरोबर समजून येते. माझें मनही अस्थिर झालें होतें. एका बाजूस आप्तस्वकीय मित्रमंडळींचें प्रेम व दुसऱ्या बाजूस ज्ञान मिळविण्याकरितां परदेशास जाण्याची जबर उत्सुकता ह्या दोन बलवान् प्रवृत्तींच्या खेंचाताणीनें मन " चीनांशुकमिव केतोः प्रतिवातं नीय मानस्य " ह्या उक्तीप्रमाणें द्विधा होणें मानवीस्वभावास अनुसरून असल्यानें त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं.

बारावर एक वाजतां करमला मेल बोटीनें मुंबई बंदर सोडलें. प्रथम मंदगतीनें बोटीचा प्रवास सुरू झाला. आप्तस्वकीय, स्नेही मंडळी रुमालांनीं, त्याचप्रमाणें करपल्लवांनीं आम्हांस निरोप देत होती. बोट दूर जाऊन पीयर अदृश्य होईपर्यंत ह्याप्रमाणें त्यांचे हातवारे चालूच होते बोट जोरानें चालूं लागली. मुंबई शहर दूर राहूं लागलें व

थोड्याच वेळानें तें आदृश्यही झालें. वर आकाश व खालीं पाणी अशी स्थिति होऊन गेली.

बोटीचें वर्णन देण्याचा माझा विचार नाहीं. कारण मुंबईसारख्या व अन्य बंदराच्या ठिकाणीं पुष्कळ बोटी पाहण्यास मिळतात. करमला मेलबोट सुमारें आठ नऊ हजार टन वजनाची होती. बोट चालू झाली त्यावेळीं समुद्र अतिशय शांत होता; तथापि समुद्र लागतो कीं काय, अशी धास्ती वाटत होतीच. पण सुदैवानें तशांतला कांहीं प्रकार झाला नाहीं. वेळेवर ब्रेकफास्ट, लंच, चहा, डिनर वगैरे बोटीवर चांगल्या प्रकारें मिळत होतें. त्याचप्रमाणें बुद्धिबळें, ड्राफ्ट्स, पत्ते इत्यादि कालक्रमणाचीं साधनें आणि पियानो वगैरे गायनाची सामुग्री इत्यादि सर्व अनुकूल वस्तु बोटींवर असल्यानें आनंदामध्यें सर्व काल जात होता. डेकवर फिरण्याची फार मौज होती. शांत व गंभीर समुद्राची शीतल हवा, आनंदी स्नेह्यांचे वार्तालाप, चांदण्या रात्रीच्या वेळीं, डेकवर खुर्च्या टाकून चंद्ररश्मींनीं प्रकाशित झालेल्या रुपेरी जलाची शोभा अवलोकन करण्याची मिळालेली संधि इत्यादि मनास आ-

ल्हाद देणाऱ्या अनेक अनुकूल साधनांच्या योगानें आमचा जहाजावरील क्षणैक मात्राप्रमाणें वेळ केव्हां जात होता, तें आह्मांस कळतही नव्हतें. कविहृदयाची स्फूर्ति आणि प्रतिभा यांचा संपूर्ण विकास होण्याच्या कामीं, प्रशांत गंभीर समुद्रावरील प्रवास फारच अनुकूल होईल, अशी माझी समजूत आहे.

याप्रमाणें प्रवास करीत करीत आमची बोट ता. १० आक्टोबर रोजीं प्रातःकाळीं अडीच वाजतां एडन बंदरीं येऊन पोहोंचली. एडन येथील दिव्यांचा चकचकाट, चंद्र-किरणांनीं प्रकाशित झालेल्या जलामध्यें इतस्ततः दृश्य-मान् होणारे बॉय लाइट्स आणि अशाच प्रकारच्या असंख्य लाल, पिंवळ्या, हिरव्या वगैरे रंगाच्या दिव्यां-च्या चकचकाटानें, निसर्गदेवी जणुं हिरे, रत्नमाणि-कांचा सुरम्य हार घालून, स्वतःच्या शयनमंदिरामध्यें निद्रावश झाल्याचा भास होत होता. त्याचप्रमाणें आजू-बाजूस असलेले पर्वत स्तब्ध उभे राहून रक्षक आणि द्वारपालांचें काम करीत असल्यानें, एडन बंदरही निर्भय-पणानें रात्रीच्यावेळीं विश्रांति घेत असल्याचा देखावा

दिसत होता सकाळच्या प्रहरीं करमाला बोटीजवळ लहान लहान मचवे पुष्कळ आले. कोळी लोकांसारखे दिसणारे लोक सिगारेट, चिरूट, वेतांच्या टोपल्या व अशाच प्रकारच्या इतर वस्तु विकण्यासाठीं मचव्यामध्यें उभे राहून प्रवाशांना दाखवून विक्रीचें काम करीत होते. स्वतःच्या घरीं जाणारे प्रवासी अशा वस्तूंची खरेदी करीत होते. बोटीच्या आजुबाजूस हा क्रयविक्रयाचा व्यवहार चालू असल्यामुळें एक लहानसा बाजार भरल्याप्रमाणें वाटत होतें. कोळसा, पाणी वगैरे घेऊन बोट नऊ वाजतां चालूं लागली. पेरिम नजीक गेल्यापासून तांबड्या समुद्रामध्यें उष्णता बरीच भासूं लागली. तांबड्या समुद्रामध्यें उष्मा फार होत असल्यामुळें पेरीम जवळील भागास पाश्चात्य लोक "गेट्स ऑफ हेल" म्हणतात. तांबड्या समुद्रामधील टर्किश बाथ टूर पुरा झाल्यावर ता. १४ रोजीं दोन प्रहरीं दोन वाजतां सुएझ बंदरीं आमची बोट येऊन दाखल झाली. एडन बंदर निसर्गसुंदर दिसतें. परंतु सुएझचें सौंदर्य कृत्रिम प्रकारचें आहे. सुएझ येथून सुएझ कॅनालमध्यें जाण्याचा रस्ता आहे. भर दोनप्रहरच्या वेळीं

सूर्यनारायण प्रखर किरणांनीं प्रकाशित होता. सुएझ येथील सुंदर इमारती सूर्यप्रकाशानें दैदिप्यमान् दिसत होत्या. दोनप्रहरीं सर्व उतारूंची डॉक्टरनें तपासणी केली. आमची बोट रात्रीं आठ वाजतां सूएझहून निघाक्याची होती. सायंकाळच्या वेळीं सूएझचा देखावा कांहीं अलौकिक दिसत होता. प्रणयीजनांच्या अनुरागानें, लज्जित झालेल्या युवतींच्या स्मितहास्याप्रमाणें सहस्ररश्मींच्या आरक्त किरणांनीं दैदिप्यमान् झालेल्या सुएझ बंदरास अवर्णनीय शोभा प्राप्त झाली होती. ठरल्याप्रमाणें रात्रीं बोट चालू झाली. सुएझ कॅनालची लांबी ८० मैल असून खोली ६० फूट आहे, असें म्हणतात. रुंदी ठिकठिकाणीं कमी जास्त आहे तरी सर्वसाधारण ती २०० फूट असेल असें वाटतें. सुएझमधून बोटी हळू हळू जातात. सकाळीं पोर्ट इस्मालिया ओलांडून आमची बोट पुढें गेली, तेव्हां गेल्या लढाईच्या वेळीं पॅलिस्टाईनवर हल्ला करण्याकरितां त्याचप्रमाणें सुएझ कॅनालच्या खास संरक्षणाकरितां जनरल एलन्बी यांनीं उभारलेला लष्करी कॅंप कंटारा हा आमच्या पाहण्यांत आला. या कॅंपाचा

विस्तार कित्येक मैल लांब पसरलेला दिसत होता. कँप-मधील लष्करी शिपाई कॅनालमध्यें नग्न स्नान करीत होते. आमची बोट त्यांच्याजवळून गेली तरी या लोकांना कांहींच वाटलें नाहीं! परंतु हिंदुस्थानामध्यें हा देखावा अदृष्टपूर्व असल्यामुळें, आम्हांला मात्र विचित्र वाटलें खरें. दोनप्रहरीं मृगजळाचे देखावे पुष्कळ पाहण्यांत आले. सूर्यप्रकाश आणि उष्णता जास्त असल्यामुळें अशा प्रकारचे देखावे या भागामध्यें नेहमीं पाहण्यांत येतात, असें आमच्या ऐकण्यांत आलें. लष्करी कँपाचा एकंदर देखावा पाहून लढाईच्या वेळची व्यूहरचना, त्याचप्रमाणें दुसऱ्या अन्य बाबतींची थोडीशी कल्पना आम्हांस आली. दोनप्रहरीं दीड वाजतां आम्हीं पोर्टसय्यद बंदरीं येऊन दाखल झालों.

पोर्टसय्यद बंदर पौर्वात्य आणि पाश्चात्य देशांच्या सरहद्दीवर आलेलें असल्यामुळें त्यास पूर्व आणि पश्चिम-मधील दिल्ली दरवाजा म्हणतात. तरी देखील पाश्चात्य शहरापेक्षां पोर्टसय्यद शहरामध्यें पौर्वात्य शहराचाच अधिक देखावा दिसतो. बोट बंदरांत उभी राहिल्यावर

आम्हीं पोर्टसय्यद शहरामध्यें फिरावयास गेलों. इजिप्शियन लोक पीळदार शरीराचे, पुष्ट आणि मजबूत बांध्याचे असलेले पाहून त्यांच्या शरीरसामर्थ्याची सहज कल्पना येण्यासारखी होती. चेहऱ्यावरून, दिसण्यांत हे लोक किंचित् उग्र दिसत होते. रस्त्यामध्यें कित्येक स्त्रिया फिरत होत्या, त्यांपैकीं पुष्कळशा गोषामध्यें होत्या. त्यांच्या नांकावर पितळेच्या किंवा लाकडाच्या नळीसारखी वस्तू पाहण्यांत येत होती. या नळीच्या योगानें या स्त्रिया अत्यंत कुरूप आणि भयानक दिसत होत्या. पोर्टसय्यद शहरामध्यें लहानशी घोड्याची ट्राम चालू असून तिचे घोडे खेंचरासारखे होते. इजिप्शियन पोलिसांचा यूनिफॉर्म पांढरा होता. मुंबई येथील कोटाच्या देखाव्याप्रमाणें पोर्टसय्यद बंदाराचा कित्येक भाग दिसतो.

याप्रमाणें सुएझ कॅनालमधील प्रवास केल्यानंतर पोर्टसय्यद पाहून आमच्या बोटीनें त्याच दिवशीं रात्रीं भूमध्य समुद्रामधील प्रवास सुरू केला. यावेळीं हवेमध्यें गारठा विशेष असल्यामुळें बिछान्यावर दोन दोन ब्लँकेटी येऊन पडल्या होत्या. भूमध्य समुद्रामध्यें दोन दिवस

तुफान झालें होतें, त्यावेळीं आह्मांस थोडा वेळ समुद्र लागला. परंतु डेकवर खुल्या हवेमध्यें फिरल्यामुळें तागडतोब आराम वाटला. वाऱ्याच्या सपाट्यानें ज्या-वेळीं बोट फारच हेलकावे खाऊन खालींवर होऊं लागते त्यावेळीं होतांहोईल तितकें करून बोटीच्या मध्यभागीं मोकळ्या हवेमध्यें फिरण्याचें करावें. असें केल्यानें समुद्र लागल्याचा परिणाम होत नाहीं. कित्येक लोक बिछान्या-वर पडून राहतात, परंतु त्यामुळें हुषारी न वाटतां हैराण-गती विशेष भासत. आह्मीं ता. २१ रोजीं प्रातःकाळीं पांच वाजतां मार्सेल्स बंदरीं येऊन दाखल झालों.

नैसर्गिक परिस्थिति आणि मानवी प्रयत्न या दोहोंच्या ऐक्यामुळें मार्सेल्स बंदर प्रत्येक बाबतीमध्यें भव्य असून मोठ्या बंदराच्या मानास सर्वतोपरी पात्र आहे. या बंदरामध्यें लहान मोठ्या अनेक बोटी पाहण्यांत आल्या. पीयरपासून बंदराच्या महत्वाची कल्पना आह्मांस सहज आली. करमाला बोट धक्क्यास लागून उभी राहिल्या-नंतर प्रवाशांना उतरण्याकरितां शिड्या टाकून रस्ता कर-ण्यांत आला. पी. अँड ओ. कंपनीची मार्सेल्सहून लंडनास

जाणारी एक्स्प्रेस गाडी आज सायंकाळीं निघणार होती. शेंकडा ८० उतारू या गाडीमधून जाणार असल्यामुळें बोटीवरील सामान वगैरे न घेतां फक्त शहर पाहण्याकरितां ह्मणून आम्हीं खालीं उतरलों. प्रो. कर्वे (प्रो. धोंडोपंत कर्वे यांचे चिरंजीव) आमच्या बरोबर होते. ते येथून पॅरिस शहरीं जाणार असल्यामुळें, त्यांना स्टेशनावर पोंहचविण्याकरितां आह्मीं गेलों. भाड्याची गाडी ठरवीत असतांना आह्मांस एक गाईड (वाटाड्या) भेटला. रस्ते दाखविणारे, त्याचप्रमाणें अन्यप्रकारची माहिती देणारे हे गाईड लोक जेथें तेथें पुष्कळ पाहण्यांत येतात. मनुष्य नवीन आहे हें ओळखून त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्याच्यापासून अयोग्य रीतीनें पैसे काढण्याचा धंदा हे लोक वेळ आल्यास करण्यास मागें पुढें पहात नाहींत. अशा लोकांपासून होतांहोईल तों लांब राहणें चांगलें. जरूर पडल्यास नाइलाजास्तव या लोकांचा उपयोग करून घेण्यास हरकत नाहीं. मात्र त्यांचा आपणांस फसविण्याचा धंदा यशस्वी होणार नाहीं, याकडे पूर्ण लक्ष असूं द्यावें. आह्मीं गाईड केला नाहीं. थोड्याच वेळांत

आह्मीं स्टेशनवर जाऊन पोंहोंचलों. बहुतेक लोक तिसऱ्या वर्गाचींच तिकिटें खरेदी करीत होते. पहिल्या अगर दुसऱ्या वर्गाचीं तिकिटें खरेदी करणारे क्वचित्च होते. तिसरा वर्ग देखील चांगला सोयीस्कर असल्यानें पाश्चात्य देशामध्यें बहुतेक लोकांचा भरणा तिसऱ्या वर्गांतून प्रवास करणारांचाच असतो. सर्व स्त्रीपुरुष स्टेशनवर स्वतःचें सामान व पेटकीं उचलून जात असल्याचें दिसलें. कोणीहि मजूर करीत नव्हते म्हटल्यास चालेल. लहानसें गाठोडें, परंतु हातांतून घेऊन जाण्याची ज्यांना लाज वाटते, किंवा तसें करणें इभ्रतीस बाध आणणारें आहे असें समजणाऱ्या हिंदी बंधूंनीं यावरून एक मोठा धडा शिकण्यासारखा आहे. मार्सेल्स शहरामध्यें फिरत असतां रस्त्यामध्यें पुष्कळ ठिकाणीं, चांगले धष्टपुष्ट आणि उत्तम बांध्याचे घोडे मोठमोठे खटारे खेंचून नेत असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. हे घोडे लहानशा हत्तीसारखे मोठे आणि पुष्ट दिसत होते. अनेक सुंदर इमारती, गगनचुंबित प्रासाद, उत्तम प्रकारें शृंगारलेलीं व नाना प्रकारच्या वस्तूंनीं गच्च भरलेलीं दुकानें—ज्यांच्यापुढें मुंबईतील

व्हाइटवे किंवा इव्हान्स फ्रेझर कंपनीचीं दुकानें यःकश्चित् भासत होतीं. त्याचप्रमाणें मुद्दाम शृंगारलेलीं फुलांचीं दुकानें पाहून त्यापुढें मुंबईमधील कुलाबा, हॉर्नबीरोड किंवा फोर्टमधील दुकानें कांहींच नाहींत, अशी आमची खात्री झाली. मार्सेल्स शहराची वस्ती डोंगरामध्यें असल्यानें दार्जिलिंग अथवा साताऱ्याच्या रस्त्यासारखा थोडासा देखावा येथें पाहण्यास मिळतो. फ्रेंच लोक सभ्य, नम्र, नवीन मनुष्याचा आदरपूर्वक सत्कार करणारे आणि चेहऱ्यावरून दिसण्यांत गंभीर असे दिसत असल्यामुळें सोदेगिरी करणारे हे लोक नसावेत, असें आह्मांस वाटलें. त्यांच्या चेहऱ्यावरून हे लोक आनंदी, निर्मळ अंतःकरणाचे आणि सरळ स्वभावाचे असल्याचें दिसून येत होतें. फ्रेंच स्त्रियाही सुंदर, हास्यमुख आणि बांधेसूद असून आनंदी दिसत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर लावण्य आणि मधुरतेची छटा स्पष्ट दिसत होती. सर्व स्त्रियांचे व पुरुषांचे पोषाक काळ्या वर्णाचे-परंतु बहुतेक एकाच रंगाचे होते. एका फुलाच्या दुकानासमोर एका पुरुषानें एका तरूण स्त्रीचें मुखचुंबन केलें. हा भररस्त्यामधील

हिंदुस्थानामध्यें अदृष्टपूर्व देखावा पाहून आह्मीं तर आश्चर्यचकित झालों! परंतु सभोंवतालच्या असंख्य लोकांना त्यासंबंधीं कांहीं वाटलें असावें, असें त्यांच्या मुखचर्येवरून दिसत नव्हतें. पाश्चात्य देशामध्यें हा प्रघात प्रचलित असल्यामुळें त्याचा विधिनिषेध कोणासहि वाटत नाहीं. प्रो. कर्वे हे पॅरिसकडे जाणाऱ्या गाडीनें निघून गेले आणि आह्मीं करमाला बोटीवर येऊन पोहोंचलों.

त्याच दिवशीं रात्रीं (ता. २४ रोजीं) मार्सेल्स सोडून जिब्राल्टर बंदरीं आमची बोट येऊन उभी राहिली. जिब्राल्टरचा किल्ला प्रसिद्ध असून हें एक मोठें लष्करी ठाणें आहे. जिब्राल्टरचा उंच खडक (Rock) पाहण्यांत आला. लहान लांचमध्यें बसून आम्हीं किनाऱ्यावर उतरलों. किल्यामध्यें शिरते वेळीं एका ब्रिटिश अंमलदारानें आमचा पासपोर्ट पाहून आम्हांस पास दिला. गाडी करून आम्हीं स्पॅनिश जिब्राल्टर पाहण्यास गेलों. सर्व शहर न पाहतां शहराचा थोडाच भाग आम्हीं पाहिला. सर्व रस्ते फरसबंदी, परंतु अरुंद होते. स्पॅनिश

स्त्रीपुरुषांचा पोषाख काळाच होता. पुरुष मजबूत बांध्याचे आणि उंच होते. स्त्रिया देखील मजबूत आणि सशक्त असून त्यांचे केंस काळे होते. अंगकांति हिंदवासियांसारखी दिसत होती. येथें गाढवावर बसून जाणारे पुष्कळ लोक आमच्या पाहण्यांत आले. त्याचप्रमाणें गवताच्या उघड्या मैदानांत चरणाऱ्या व मोठ्या कासेच्या लाल रंगाच्या स्पॅनिश गाईही पुष्कळच दिसल्या. वेळ थोडा असल्याकारणानें ब्रिटिश जिब्राल्टर पाहून आम्हीं बोटीवर परत येऊन दाखल झालों. जिब्राल्टरची हवा, शहराची रचना, किल्ला आणि खडका (Rock) चा देखावा, त्याचप्रमाणें आरोग्याकडे अधिक लक्ष पुरविलें गेलें असल्यामुळें, शहरामध्यें एकंदरींत दिसून येणारी स्वच्छता आणि टापटीप पाहून आमच्या मनास एक प्रकारचा आल्हाद वाटला.

दोनप्रहरीं दोन वाजतां करमाला चालूं लागली. बे ऑफ बिस्केमधील प्रवास पुरा करून ता. २८ रोजीं आह्मीं प्लायमाऊथ जवळ येऊन पोहोंचलें. वेळ सकाळची होती. येथें बहुतेक उतारू रेल्वे रस्त्यानें जाण्यासाठीं

बोटींतून उतरले. आमची बोट प्लायमाउथपासून लांब उभी राहिली असल्यामुळें, शहराचा देखावा आमच्या दृष्टीस पडला नाहीं. परंतु नजीकच्या किनाऱ्यावरील इंग्लंड कंट्रीचा सुंदर देखावा प्रथमच आमच्या पाहण्यांत आला. एक राखीव जंगल नजीकच दिसत होतें. धुकें फार पडल्यामुळें आल्पावधींतच सर्व अदृश्य झालें. आज थंडी फारच भासूं लागली होती. इंग्लिश चॅनलचा प्रवास पुरा करून ता २९ रोजीं सकाळीं करमाला बोट थेम्स नदीवरील लंडनच्या टिल्बरी डॉक्समध्यें येऊन दाखल झाली. पासपोर्ट तपासणी झाल्यावर इमिग्रेशन ऑफिसरानें आम्हांस लँडिंग कार्ड दिलें. ते घेऊन, कस्टम्स अधिकाऱ्याकडून सामानाची तपासणी झाल्यावर लहानशा लांचमध्यें बसून आम्हीं टिलबरी स्टेशनवर येऊन दाखल झालों व गाडीमध्यें बसून लंडन शहराच्या फेंचचर्च स्टेशनावर येऊन उतरलों.

प्रकरण २ रें.

लंडन शहर.

लंडन शहरीं राहण्याची स्वतंत्र सोय प्रथम पासूनच केलेली नसेल तर, इंडिया ऑफिसकडून राखलेली २१ क्रॉमवेलरोड साउथ केन्सिग्टन ही जागा नवीन आलेल्या हिंदवासियांस राहण्याकरितां अनुकूल आहे. आह्मीं राहण्याची प्रथम कांहीं तजवीज केली नसल्यामुळें तेथें गेलों. यावेळीं हिंदवासियाचा येथें बराच भरणा आला असल्यामुळें, सर्व जागा गच्च भरून गेली होती. तथापि कसेंतरी करून आमचीही राहण्याची सोय झाली. ही जागा हिंदी विद्यार्थ्यांकरितांच खास ठेवलेली आहे. तथापि जागेची सवड असेल तर वाटेल त्या हिंदवासियास चौदा दिवसपर्यंत येथें राहण्याची परवानगी असते. या मुदती-मध्यें दुसरी जागा शोधून काढावी लागते आणि तेवढ्या मुदतींत दुसरी एखादी जागाही सहज मिळते. आह्मीं

ज्यावेळीं लंडन शहरीं उतरलों, त्यावेळीं सर्व शहर बाहेरून आलेल्या लोकांनीं चिकार भरून गेल्यामुळें जागेची बरीच पंचायत पडली. बाहेरचे सुमारें वीस लाख लोक लंडन शहरीं यावेळीं होते, असें आह्मीं ऐकिलें. जागेचा शोध करीत करीत जेथें जेथें आह्मीं गेलों, तेथें तेथें " full up sorry " "बिलकूल जागा नाहीं, दिलगीर आहों" हेंच उत्तर आह्मांस मिळत होतें! जागेकरितां बरेंच हिंडावें लागलें, परंतु त्यामुळें आमचा एक मोठा फायदा झाला. सर्व लंडन शहर व आजूबाजूचीं सर्व स्थळें चांगल्या रीतीनें आमच्या पाहण्यांत आलीं व त्यामुळें लंडन शहरची खडान्‌खडा संपूर्ण माहिती आह्मांस मिळाली. बाईटांतून चांगलें निघतें ह्मणतात ते हें. शेवटीं आह्मांस जागा मिळाली. नवीन आलेल्या मनुष्यानें जागा पाहण्याकरितां घरोघरीं न फिरतां 'डेली टेलिग्राफ' किंवा 'टाइम्स' सारख्या पत्रामध्यें जाहिरात द्यावी. तसें केल्यानें दुसरे दिवशीं पुष्कळ पत्रें येतील व त्यावरून जागा पाहून त्यामध्यें आपल्या दृष्टीनें जी पसंत पडेल, ती राखावी. आह्मींही ह्याप्रमाणेंच केलें होतें. राहण्याच्या जागेसंबंधीं

ठराव करतांना, घरवाल्या बाईबरोबर आवश्यक बाबतींसंबंधीं स्पष्ट उलगडा करून सर्व गोष्टी चौकसपणानें नक्की कराव्यात. ह्मणजे मागाहून तक्रार किंवा गैरसमज होण्यास बिलकूल जागा उरणार नाहीं. क्षुल्लक बाबतींत काय बोलावयाचें? असें ह्मणून मुग्धता स्वीकारल्यास मागाहून तक्रार आणि त्रास होण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ, गरम पाणी पाहिजे असल्यास—आणि गरम पाण्याची खास जरूर ह्या थंड प्रदेशामध्यें पडतेच—प्रथमपासून तसें ठरवावें. जागा पसंत न पडल्यास आठ दिवस आगाऊ किंवा ठरावाप्रमाणें प्रथम सूचना देऊन सोडण्यास हरकत नाहीं.

नवीन आलेल्या माणसास रस्त्यांची माहिती नसते, ह्मणून त्यानें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. 'लंडन स्ट्रीट गाईड'सारखीं माहितीदर्शक पुस्तकें रेल्वेवरील बुकस्टॉलसमध्यें किंवा अन्य ठिकाणीं पुष्कळ मिळतात. त्यावरून पाहिजे ती माहिती तावडतोब मिळूं शकते. रस्त्यामधील सर्व घरांवर नंबर लिहिलेले असतात, त्याचप्रमाणें रस्त्याचे दोन्ही बाजूंस मोठ्या अक्षरांनीं रस्त्याचें नांव लिहिलेलें

असतें. त्यावरून पाहिजे तें घर ताबडतोब सांपडतें. घराचें दार नेहेमीं बंदच राहतें. बाहेरून जाणाऱ्या मनुष्यानें दाराजवळ घंटडीचें बटन दाबल्यास आंत वर्दी पोहोंचते आणि ताबडतोब दार उघडण्यांत येऊन ज्यांस भेटावयाचें असेल किंवा बोलावयाचें असेल, त्यांजबरोबर बोलतां येतें. घंटडीच्या बटनवर Ring असें किंवा दारावर Ring and knock याप्रमाणें शब्द लिहिलेले असतात. कित्येक दरवाजाजवळ रात्रीं वाजविण्याची स्वतंत्र घंटा असते. तिच्या बटनावर Night असें लिहिलेलें असतें. त्याचप्रमाणें नोकरांकरितां जी घंटी असते तिच्या बटनावर Servants आणि दुसऱ्यावर Visitors याप्रमाणें कित्येक ठिकाणीं पाहण्यांत येतें. जागेचा शोध करावयाचा असेल तर सरळ पोलीसजवळ जाऊन त्यास विचारलें, कीं ताबडतोब सभ्यतापूर्वक त्यांच्याकडून बरोबर माहिती मिळते. लंडन पोलिसांची सभ्यता, माहिती देण्याची उत्सुकता वगैरे अनेक गुण अनुकरणीय आहेत. इतर ठिकाणचे पोलीस त्यांच्या या गुणांचें अनुकरण करितील तर जनतेच्या दृष्टीनें फार चांगलें होईल. पोलिस शिपाया-

खेरीज दुसऱ्यास होतांहोईतों रस्त्यासंबंधीं किंवा दुसरी माहिती विचारूं नये. एक तर दुसऱ्या लोकांना बरोबर माहिती नसते आणि दुसरें, कदाचित् लबाड लफंग्या माणसाची गांठ पडल्यास तो नवीन मनुष्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यास फसविण्याची धास्ती असते.

लंडन शहर जगांतील व्यापाराचें मुख्य केंद्र असून त्याचा विस्तार फारच मोठा आहे. अशा मोठ्या विस्ताराच्या शहरामध्यें वाहनें आणि जलद प्रवास करण्याचीं साधनें जर बरोबर नसतील तर व्यापारधंद्यास फारच हरकत होणार, हें उघड आहे. रस्त्यावर कित्येक ठिकाणीं विजेच्या ट्राम गाड्या चालतात. त्या शिवाय मोटरबस गाड्या सर्व मोठमोठ्या रस्त्यांवरून एका भागाहून दुसऱ्या भागास जाणाऱ्या पाहण्यांत येतात. ह्या बसच्या आंतील भागीं सोळा माणसें व वरील भागीं अठरा माणसें बसण्याची सोय असते. बसवर निरनिराळे नंबर लिहिलेले असतात, त्याचप्रमाणें ज्या ज्या रस्त्यांनीं बस जाणार असेल, त्या रस्त्यांपैकीं मुख्य मुख्य रस्त्यांचीं नांवें तीवर लिहिलेलीं असल्यामुळें, ज्या ठिकाणीं जावयाचें असेल त्या

ठिकाणीं जाणारी बस मनुष्यास सहज ओळखतां येते. ठराविक जागीं तीं उभी राहते, परंतु मध्यंतरीं हातानें खूण केल्यास ती उभी करितात. बस आणि विजेच्या ट्रामगाड्या जरी रस्त्यांनीं शक्य तितक्या त्वरेनें जातात, तरी रस्त्यावरील राहदारीमुळें त्यांची गति प्रसंगोपात कमी राखण्यांत येते. म्हणून या साधनांखेरीज लंडनसारख्या औद्योगिक भरभराटीच्या ठिकाणीं दुरून येणाऱ्या इतर लोकांकरितां अन्य साधनांची जरूर असतेच. याकरितां ज्यांना टयूब अथवा अंडरग्राउंड म्हणतात, अशा विजेच्या गाड्या प्रवाशांची नेआण करण्याचें काम फार जलद्पणें करितात. ह्या अंडरग्राउंड गाड्या जमिनीच्या अंतर्भागामधून जातात. जमीन पोखरून बोगद्यासारखे रस्ते केलेले आहेत, त्यांतून ह्या विजेच्या गाड्या मिनिटामिनिटास दौडत असतात. इंजिनियरिंग ज्ञानाच्या साहाय्यानें काय काय होऊं शकेल, याचें उत्तम उदाहरण ह्या अंडरग्राउंड गाड्या होत. जमिनीमधील बोदग्यासारख्या रस्त्यांमध्यें पंपानें हवा भरण्यांत येते. त्यायोगानें गुदमरून जाण्याचा संभव नसतो. हिंदु-

स्थानांतील रेल्वेच्या तिकिट ऑफिसाजवळ ज्याप्रमाणें लोकांची गर्दी आणि खेंचाखेंची पाहण्यांत येते, तशी इकडे पाहण्यांत येत नाहीं. मनुष्य पुढें उभा असेल, तर त्यास ढकलून बाजूस सारण्याचा इकडे कोणी प्रयत्न करीत नाहीं. एक मनुष्य पुढें उभा असेल तर त्याच्या पाठीमागें दुसरा, तिसरा याप्रमाणें सर्व लोक ओळीनें उभे राहतात व आपली पाळी आली ह्मणजे टिकीट घेऊन रस्ता धरतात. विजेच्या लिफ्टमध्यें बसून खालीं किंवा वर जातां येतें. एकापेक्षां जास्त प्लॅटफॉर्म असतील तर तिकिट पंच करणारा मनुष्य दिशा दाखवितो. ज्या दिशेस गाडी जात असेल, त्या बाजूच्या सर्व स्टेशनांचीं नांवें मोठ्या अक्षरांनीं भिंतीवर अगर दुसऱ्या प्रसिद्ध ठिकाणीं लिहिलेलीं असतात. त्यामुळें चूक होण्याचा संभव फारच थोडा रहतो. वाटेल तितकी चिकार गाडी भरलेली असो, यत्किंतूही धांदल किंवा गडबड होत नाहीं. "Allow passengers to alight first please" "उतारूंना प्रथम उतरूं द्यावें" असें प्रत्येक डब्यावर लिहिलेलें असतें. सर्व उतारू उतरल्यानंतर, लाइनबंध उभे

राहिलेले लोक एकामागून एक याप्रमाणें डब्यांत जाऊन बसतात. ह्या सर्व गोष्टी इतक्या लवकर होतात कीं, एकाच मिनिटाचे आंत सर्व लोक गाडींत बसून गाडी चालूं लागते. हा शिस्तीचा परिपाठ लोकांच्या अगदीं अंगवळणीं पडून गेलेला आहे. हिंदुस्थानांतही अशी शिस्त असणें कांहीं कठीण नाहीं. पहिला आणि तिसरा ह्याप्रमाणें दोनच वर्ग अंडरग्राउंडमध्यें असतात. ट्यूबमध्यें कित्येक ठिकाणीं फक्त तिसराच वर्ग असतो. तिसरा वर्ग देखील फार सोयीचा असून बसण्याची जागाही फार चांगली असते. यामुळें बहुतेक सर्व प्रवासी तिसऱ्या वर्गातूनच प्रवास करितात. लहान सूटकेस किंवा अशाच प्रकारचें हलकें सामान बरोबर नेतां येतें. डब्यामध्यें सर्व जरूरीची माहिती देणारा नकाशा असतो, त्यावरून रेल्वे स्टेशन वगैरेंची चांगली माहिती मिळते. स्टेशनावर त्याचप्रमाणें इतर ठिकाणीं रेल्वेचे नोकर उतारूंशीं फारच सभ्यपणानें व विनयशीलपणानें वागतात व माहिती देण्याचे कामीं फार उत्सुक असतात. प्रवाशांना त्रास न होईल इकडे सर्व रेल्वे नोकरांचें लक्ष्य असतें.

हिंदुस्थानांतील रेल्वे नोकर यांतील थोडें जरी शिकतील तर किती तरी बरें होईल !

आम्हीं भर हिंवाळ्यामध्यें लंडन शहरीं आल्यामुळें प्रथम प्रथम आम्हांला थंडी फारच कडक वाटली. हिंदुस्थानामधून निघते वेळीं पुष्कळ पैसे खर्च करून शिवलेले कपडे येथील थंडीपुढें निरुपयोगी व कुचकामाचे ठरले व नवीन कपडे करण्याची आम्हांस जरूर पडली. उन्हाळ्यामध्यें हिंदुस्थानांतून निघावयाचें असेल आणि निघणारा मनुष्य यूरोपियन तऱ्हेचे कपडे हिंदुस्थानामध्यें वापरीत असेल तर त्याच कपड्यावर हिंदुस्थानाहून विलायतपर्यंतचा प्रवास होऊं शकेल. त्यावेळीं कपड्यांमध्यें जास्त खर्च करूं नये. उन्हाळ्याशिवाय इतर वेळीं निघावयाचें असेल तर स्वतःच्या जवळ असलेल्या कपड्यांशिवाय एक गरम सूट आणि एक ओव्हरकोट राखावा. उन्हाळ्यामध्यें देखील एक गरम सूट आणि ओव्हरकोट असल्यास वावगें होणार नाहीं. मात्र पैसे फार खर्च करूं नयेत. भूमध्य समुद्रमध्यें थंडी फार भासते व त्यावेळीं

गरम कपड्यांची जरूर पडते. म्हणून एक गरम सूट आणि ओव्हरकोट असेल तर बस्स आहे. आंत वापरण्या-करितां गरम अंडरवेअरचे दोन तीन जोड ठेवावेत. कारण त्यांचा उपयोग विलायतेंत फार होतो. हिंदुस्था-नांत कपड्यासाठीं फार खर्च करू नये, हें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, इकडे आल्यानंतर, कपड्यांची शिवणावळ, सफाई, आणि फॅशन निराळ्या प्रकारची असल्यानें हिंदुस्थानामधून आणिलेले कपडे जवळ जवळ निरुपयोगीच होऊन खर्च विनाकारण केल्यासारखें होतें. म्हणून जरूर पुरता एक गरम सूट आणि ओव्हरकोट बरोबर असला तर भूमध्य समुद्रामधील थंडीच्या कामीं त्याचा उपयोग होतो. विलायतेस आल्यानंतर चार आठ दिवसांनीं तेथील रीतिरिवाजास अनुसरून व हवापाण्यास माफक येतील व ज्या समाजामध्यें आपणांस वावरावयाचें असेल त्या समाजास योग्य अशा प्रकारचे कपडे चांगल्या दुकानामध्यें शिवून घेणेंच जास्त सोयीवार पडतें. या योजनेनें दुबार खर्च न होतां मर्जीनुरूप चांगले कपडे वापरण्यास मिळतात. गरम सूट आणि ओव्हर-

कोट जो आणावयाचा तो साधारण किंमतीचा व हिंदु-स्थानामध्यें परत गेल्यावरही वापरतां येईल, अशा प्रकारचा असावा. विलायतमध्यें चांगला ओव्हरकोट—स्वतःच्या आवडीप्रमाणें व येथील रीतिरिवाजास अनुसरून करून घ्यावा. ओव्हरकोट मात्र चांगलाच असला पाहिजे. लांबच्या प्रवासास जावयाचें असल्यामुळें, हिंदुस्थानामधून लोक फारच सामान बरोबर घेऊन इकडे येतात. त्या सामानाचा कांहींच उपयोग न होतां जेथें तेथें उचलण्या-करितां मजूरी खर्च मात्र विनाकारण होतो. मोठमोठ्या पेट्या, सूट केसीस, हँडबॅग्ज, होल्ड ऑल, बिछाना, या-प्रमाणें पुष्कळ सामान जे कोणी आपल्याबरोबर इकडे आणतात, त्यांना फारच त्रास पडतो. इकडे बिछान्याची तर बिलकूलच जरूर नाहीं. कारण बोटीवर चढल्यापासून तों हिंदुस्थानास परत जाईपर्यंत सर्व यूरोपमध्यें, खासगी ठिकाणीं किंवा हॉटेलमध्यें जेथें राहवयाचें असेल तेथें बिछान्याची सवड असते. एक हँडबॅग, एक कराचीची स्टील ट्रंक आणि एक सूट केस बरोबर आणिली तरी चालण्यासारखें असतें. यापेक्षां जास्त सामानाची बिलकूल

जरूर पडत नाहीं. सामान जितकें कमी, त्या मानानें प्रवासामध्यें कमी त्रास पडतो. म्हणून आउटफीटच्या कामीं हिंदुस्थानांत होतांहोईल तितके कमी पैसे खर्च करणें श्रेयस्कर आहे. कोणत्याही उपयुक्त सामानाची जरूर पडल्यास तें येथें मिळूं शकतें. स्त्रियांनीं आपणांस ज़रूर तें सामान बरोबर घ्यावें. त्याचप्रमाणें श्रीमान् लोक, ज्यांना पैशाची कमतरता नाहीं, त्यांनीं ज्यास्त सामान घेतल्यास चालण्यासारखें आहे. वरील सूचना साधारण स्थितींतील मनुष्यासंबंधीं केल्या आहेत. या बाबतींत माझे परम मित्र रा. भास्करराव काशिनाथ भाटे बी. ए., पाटण विभागचे नायब सुभे, यांनीं ज्या सूचना केल्या होत्या त्या शब्दशः खऱ्या ठरल्या. रा भाटे यांच्याप्रमाणेंच विलायतेहून परत जाणारी मंडळी नवीन मंडळीस उपयुक्त सूचना करतील, तर किती तरी बरें होईल!

लंडन हें जगांमध्यें प्रसिद्ध व मोठें शहर असून व्यापाराचें केंद्रस्थान व ब्रिटिश साम्राज्याची राजधानी आहे. औद्योगिक भरभराटीच्या ह्या पट्टनगरीमध्यें, जगांतील सर्व देशांतले निरनिराळे धर्म पाळणारे लोक स्वतःच्या

कामकाजाचे निमित्तानें नेहमीं येत जात असतात. त्यामुळें लंडनमध्यें राहणाऱ्या मनुष्यास भिन्न भिन्न धर्मांच्या व राष्ट्रांच्या लोकांच्या समागमामध्यें येऊन त्यांचे रीतिरिवाज, आचारविचार, स्वभाववैचित्र्य वगैरेंचें निरीक्षण करण्याची संधि मिळून ज्ञानसंपन्न होण्यास फार सोईचें पडतें. मात्र या संधींचा लाभ पूर्णपणें घ्यावयाचा असेल, तर घरामध्यें बसून किंवा ज्या धंद्याकरितां आपण आलों असूं त्या धंद्यामध्येंच सर्व वेळ गमावून चालावयाचें नाहीं. उपवनें, क्रीडाभुवनें, नाटकशाळा, त्याचप्रमाणें दुसऱ्या अनेक ठिकाणीं लोकांना भेटून त्यांच्याशीं मिळून मिसळून वागून, सभ्यतापूर्वक गोष्टी करून, परस्पर विचारांचा विनिमय करून स्वतःच्या ज्ञानामध्यें भर टाकण्याच्या मिळालेल्या संधीचा बरोबर उपयोग करून घ्यावा. "Etiquette" रीतिरिवाजाच्या बाबतींत असें केलें पाहिजे, तसें केलें पाहिजे, असें करूं नये तसें करूं नये, याप्रमाणें हिंदुस्थानामध्यें सांगण्यांत येत असल्यामुळें आपली चूक होत आहे किंवा काय, अशी साहजिक शंका मनुष्यास येते. परंतु तशी शंका किंवा भीति

वाळगण्याचें कारण नाहीं. इच्छा असेल आणि मनुष्य कान आणि डोळे उघडून पाहील तर त्यास थोड्याच दिवसांत येथील सामाजिक परिस्थितीचें ज्ञान होईल. मात्र नेहमीं सभ्य वर्तन ठेवून वागण्याची खबरदारी घेणें अगत्याचें आहे.

लंडन शहरामध्यें पाहण्यासारखीं स्थळें पुष्कळ आहेत. त्यासंबंधींची माहिती (London Guide) लंडन गाईड-सारख्या पुस्तकामधून मिळूं शकते. विशेषतः खालीं वर्णन केलेलीं ठिकाणें अवश्य पाहण्यासारखीं आहेत.

टॉवर ऑफ लंडनः—विलायतचा इतिहास वाचणाऱ्या प्रत्येक मनुष्यास या किल्याचें नांव माहीत आहे. ह्या ठिकाणीं इतिहास प्रसिद्ध अशीं अनेक बरीं वाईट कृत्यें घडलीं आहेत. सर वाल्टर रॅले, लेडी जेन ग्रे वगैरे लोकांना देहांत प्रायश्चित्त या किल्यामध्येंच देण्यांत आलें होतें. येथें पूर्वींच्या काळीं अपराधी लोकांना शासन करण्याकरितां उपयोगांत आणलेलीं भिन्न भिन्न प्रकारचीं हत्यारें, मोठमोठ्या कुऱ्हाडी, सांखळदंड, गर्दन उडविण्याकरितां तयार केलेले लांकडाचे संचे, त्याचप्रमाणें लेडी जेन ग्रे-

सारख्या अबलांची गर्दन निर्दयपणानें ज्यांच्या साहाय्यानें उडविण्यांत आली, अशीं हत्यारें पाहण्यासाठीं ठेविलीं आहेत. थोड्याच शकतकापूर्वीं पाश्चात्य सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें अशा निर्दयपणाचीं कृत्यें करण्यांत येत होतीं, याचें प्रत्यंतर, हीं अमानुष-निर्घृण हत्यारें व गलिच्छ अंधारकोठड्या पाहिल्यानें सहज येते. जुन्या वेळचीं लष्करी हत्यारें व चिलखतेंही येथें पाहण्यास मिळतात. 'रिगेलिया'-मध्यें प्रसिद्ध आफ्रिकन हीरा ' कुलीनन ' पाहण्यास मिळतो. हिंदुस्थानचा प्रसिद्ध हीरा कोहीनूर हा अस्सल येथें पाहावयास मिळत नाहीं. कारण तो नेहमीं सम्राज्ञी-जवळच असल्याचें ऐकण्यांत आलें. त्याची नक्कल येथें ठेवण्यांत आली आहे, ती पाहूनच संतोष मानून घ्यावा लागतो! जुन्या वेळच्या बांधणीची कल्पना हा किल्ला पाहिल्यानें होते.

हॅम्टन कोर्टः—हें लंडनच्या बाहेर आहे. येथें रेल्वेनें किंवा ट्रामनें जातां येतें. कार्डिनल वुल्से यांनीं हा राजवाडा प्रथम बांधला व कांहीं वर्षें त्यांत राहून आठव्या हेनरी राजास भेट म्हणून त्यांनीं दिला होता. जुनीं

पेंटिंग्ज येथें पुष्कळच दिसलीं. त्याचप्रमाणें खिडक्यांचे सुंदर रंगीत कांचही पाहण्यांत आले. कॅथराईन हावर्ड राणीवर जारकर्माचा आरोप ठेवून राजानें तीस फांशीं दिलें होतें, तिचें पिशाच्च एका दिवाणखान्यामध्यें हल्लीं फिरत असतें, असें आमच्या वाटाड्यानें आह्मांस सांगितलें. महालाच्या सभोंवार उत्तम बाग आहे. त्यांत कृत्रिम लहान मोठे जलाशय पुष्कळ असल्यानें बागाची शोभा अप्रतिम दिसते. येथें असलेलें एक जुन्या वेळचें (Viue Tree) द्राक्षाचें झाड पाहण्यासारखें आहे. इ. स. १७६८ मध्यें त्याची लागवड केली होती. हल्लीं त्याचा घेर ४८ इंच असून मुख्य डाहळी ११४ फूट लांब आहे. हा राजवाडा उन्हाळ्यामध्यें खास पाहण्यासारखा असतो.

हाउसेस ऑफ पार्लमेंटः—वेळेचा अभाव किंवा दुसऱ्या कोणत्याही सबबीवर प्रवाशानें हाउसेस ऑफ पार्लमेंट पाहण्याची संधि दवडूं नये. इमारतीचा आंतील भाग केव्हांही पाहावयास उघडा असतो. परंतु ज्यावेळीं पार्लमेंटचें काम चालू असतें, त्यावेळीं पाहणें असल्यास एखाद्या मेंबराची शिफारस किंवा इंडिया ऑफिस-

कडून पास मिळविला पाहिजे. इंडिया ऑफिसकडे मागणी केल्यास पास सहज मिळूं शकतो. आणि जर मेंबराचीच शिफारस घ्यावयाची असेल आणि कोणाचीही ओळख नसेल तर आंत प्रवेश करते वेळीं चालू असलेलें काम 'Debate' पाहण्याची इच्छा आहे, असें सांगितल्यास मेंबर फार्मवर सही करून देतात आणि स्ट्रेंजर्स गॅलरीमध्यें जागा मिळून वादविवाद ऐकावयास मिळतो. हा वादविवाद निदान एक वेळ तरी प्रत्येक प्रवाशानें अवश्य ऐकावा, अशी माझी शिफारस आहे. हाउस ऑफ लॉर्ड्सचा देखावा अमीर लोकांच्या इभ्रतीस साजेल असा भपकेबाज आणि भव्य आहे. हाउस ऑफ कॉमन्सचा देखावा त्याच्यापेक्षां किंचित् उतरत्या दरज्याचा असून साधा आहे. कॉमन्समध्यें काम चालतें, त्यावेळीं कडक निर्बंध न राहतां मोकळ्या मनानें, ऊहापोह, वाटाघाट होते व केव्हां केव्हां मोठा कडाक्याचा वादविवाद होऊन मग कोणत्याही बाबतीचा निर्णय होत असतो. ब्रिटिश साम्राज्यासंबंधींच काय, पण सर्व जगाच्या राजकारणावर ह्या ठिकाणीं ऊहापोह होऊन, निरनिराळ्या राष्ट्रांच्या भवितव्यतेचे मार्ग येथें आंखले

जातात. कॉलेजमध्यें डिबेटिंग यूनियनमध्यें ज्याप्रमाणें वादविवादास फारसे निर्बंध न राहतां वादविवाद होतो, तशाच प्रकारें, मोठ्या प्रमाणावर येथें वादविवाद होत असल्यानें, हाउस ऑफ कॉमन्सला जगरूपि कॉलेजचा मोठा डिबेटिंग यूनियन म्हणावयास हरकत नाहीं. हाउस ऑफ कॉमन्सची इमारत फार भव्य असून तिच्या टॉवर-वर प्रसिद्ध "बिगबेन" नांवाचें मोठें घड्याळ आहे. या घड्याळाच्या तबकडीचा व्यास २२॥ फूट असून मिनिट कांटा १४ फूट, अवर कांटा ९ फूट आणि आंकडे दोन दोन फूट लांब आहेत !

या शिवाय ब्रिटिश म्यूझियम, नॅशनल गॅलरी, साउथ केन्सिंग्टन म्यूझियम्स, सेंटपॉल कॅथेड्रल, वेस्ट मिन्स्टर ॲबे, झ्यूऑलॉजिकल गार्डन्स, हाइड पार्क, क्यू गार्डन्स, क्रिस्टल पॅलेस, विन्डसर कॅसल, मॅडम टसॉडस वॅक्स वर्कर्स् इत्यादि स्थळें पाहण्यास प्रवाशानें विसरूं नये. ब्रिटिश म्यूझियम, त्याचप्रमाणें दुसऱ्या प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन केल्यास एक मोठा स्वतंत्र ग्रंथ होईल. ब्रिटिश म्यूझियम पाहिल्यानें जगांतील भिन्न भिन्न देशां-

मध्यें प्राचीनकाळीं उद्योगधंदे, शिल्पकला इत्यादि कशा-प्रकारची होती, तें पाहण्यास मिळून पाश्चात्य देश कशा कशा परिस्थितींतून उन्नत होत गेले, याची कल्पना होते. येथील लायब्ररी फारच मोठी असून तींत चाळीस लाखां-वर ग्रंथ आहेत. युनायटेड किंग्डममध्यें छापलेल्या प्रत्येक पुस्तकाची प्रत येथें पाठविण्यांत येते. रिसर्च काम कर-णारीं किंवा नवीन पुस्तकें लिहिण्याचें काम करणारीं दररोज कमींत कमी चार पांचशें माणसें येथें वाचनाचें व लिहिण्याचें काम करीत असतात व त्यांना या लायब्ररीचा फारच उपयोग होतो.

सारांश, लंडन शहरामध्यें सर्व जगांतील औद्योगिक, सामाजिक, राजकीय, नैतिक, शिक्षणविषयक इत्यादि बाबी एकसमयावच्छेदेंकरून प्रतिबिंबित झालेल्या अस-ल्यामुळें, या शहराच्या अंतर्बाह्य स्वरूपासंबंधानें उत्तम प्रकारचा अभ्यास करणारास जगाचें ज्ञान चांगल्या प्रकारें प्राप्त होईल, यांत संशय नाहीं.

प्रकरण ३ रें.

डेन्मार्क.

लंडन शहरामध्यें फार दिवस राहिल्यामुळें या अवाढव्य शहरांतील भयंकर गडबड, धांवपळ आणि सर्वांपेक्षां त्रासदायक बाब ह्मटली ह्मणजे धुरापासून उत्पन्न होणारी ग्लानि इत्यादि कारणांनीं आमच्या मनावर एक प्रकारची खिन्नता यावयास लागली होती. याच वेळीं आह्मांस रजा पडल्यामुळें, रजेचे दिवस मौज मारण्यांत न घालवितां सरकारी कामामध्येंच घालविण्याचा आह्मीं विचार केला. ता. २७ मार्च १९२० रोजीं सकाळीं लिव्हरपूल स्ट्रीट स्टेशनवरून आमची गाडी निघाली. इंग्लिश कंट्रीचा नयनाल्हादक देखावा पाहात पाहात आह्मीं दोन तासाच्या आंत हारिच बंदरीं येऊन पोहोंचलों. धुक्यानें ग्रस्त झालेल्या लंडन शहरच्या हवेंतून बाहेर पडल्यामुळें, मनास विशेष प्रकारची हुषारी वाटूं लागली

होती. आमच्या बरोबर पोर्टरिकोचे माजी फिनॅन्स मिनिस्टर होते. ते डेन्मार्कमध्यें शेतकीसंबंधीं तपास करण्यास जात होते व आमचेंहि काम तशाच प्रकारचें असल्यामुळें आह्मीं सर्व बरोबरच मिळून जात होतों. दोन प्रहरीं दीड वाजण्याच्या सुमारास आमची दोन हजार टन वजनाची स्कँडेनेव्हीयन बोट हारीच बंदर सोडून चालूं लागली. गेल्या लढाईच्या वेळीं पाणसुरुंगांनीं भरलेल्या आणि लॉर्ड किचनेरसारख्या योध्यांची ज्यानें आहुती घेतली त्या उत्तर समुद्रामधून आमचा प्रवास सुरूं झाला. हा समुद्र नेहेमीं तुफानी असल्याचें आमच्या ऐकिवांत असल्यानें आम्हांस धास्ती वाटत होती. परंतु सुदैवानें प्रवासाचे वेळीं समुद्रानें शांत आणि गंभीर स्वरूप धारण केलें होतें, त्यामुळें आमचा प्रवास सुखकारक झाला. मात्र पाण्याच्या लाटा दुसऱ्या समुद्रापेक्षां येथें अधिक जोरानें उचंबळत होत्या. अद्यापही उत्तरसमुद्रामधील पाणसुरुंगांचा फडशा झालेला नाहीं, असें ह्मणतात.

ता. २८ रोजीं दोनप्रहरीं दोन वाजतां डेन्मार्कच्या दक्षिण दिशेस असलेल्या एस्बीआर्ज बंदरीं आह्मीं जाऊन

दाखल झालों. पासपोर्ट तपासणी, कस्टम्स हाऊस तपासणी वगैरे परिचित विधि पुरे झाल्यानंतर आह्मीं समुद्रकिनाऱ्या-जवळील एका मोठ्या हॉटेलमध्यें मुक्कामास गेलों. या सालीं वसंतऋतूचा आरंभ इकडे लवकर झाला असल्यामुळें, लतापल्लवांना पत्रांकूर फुटूं लागले होते, जमिनी-वर हिरवळाचा प्रादुर्भाव होऊन जिकडे तिकडे निसर्ग-देवी जणूं हिरवा शालू परिधान करून फिरत असल्याचा भास होत होता! हें बंदर दगड आणि रेतीच्या उंच-वट्यावर असल्यामुळें समुद्राचा, त्याचप्रमाणें आसमंता-तील प्रदेशाचा देखावा चांगल्या प्रकारें दिसत होता. नंतर आह्मीं गांवामध्यें फिरावयास गेलों. हिंदी लोक या देशा-मध्यें फारसे येत नसल्यामुळें व आमचा पेहेराव येथील लोकांना नवा दिसल्यामुळें, पुष्कळ मुलें आमच्या पाठी-मागें दौडत होतीं. " Blacky " " काळा आदमी " हें बहुमानाचें उपपद जसें कित्येक पाश्चात्य देशामध्यें हिंदी लोकांना बऱ्याच वेळीं मिळतें तसें येथें आह्मांस कोणी न दिल्यानें त्याचप्रमाणें त्यांच्या मुखचर्येवर आमच्या संबंधीं तिरस्कारबुद्धीचें चिन्ह न दिसतां फक्त कुतूहल-

दृष्टि स्पष्टपणें दिसत असल्यामुळें आह्मांस वाईट न वाटतां उलट आनंदच झाला. आमच्या स्नेह्यानें (पोर्टरिकाचे माजी फिनॅन्स मिनिस्टर) त्या वेळीं या कुतूहलप्रेरित बालकांचें छायाचित्र घेतलें.

एस्बीआर्ज येथें आमच्या कामाकरितां ता. ३१ पर्यंत राहून तेथील को-ऑपरेटिव्ह सोसायटी, बेकन फॅक्टरी, एगएक्स्पोर्ट वगैरे उपयुक्त संस्था आह्मीं पाहिल्या. ब्रिटिश कॉन्सल, इटॅलियन कॉन्सल त्याचप्रमाणें इतर डेन लोक यांनीं आमच्या कामामध्यें आह्मांस उत्तम मदत करून जरूर ती माहिती मिळवून दिली. एस्बीआर्जची वस्ती वीस बावीस हजाराची आहे. गांव शांत आणि अत्यंत स्वच्छ असून, समुद्रावरून वाहणाऱ्या शीतल वायूचा संपूर्ण लाभ त्यास मिळत असल्यामुळें, लंडनसारख्या मोठ्या शहरामध्यें राहून उद्विग्न झालेल्या आमच्या मनास येथें बरीच शांति मिळून आह्मीं आनंदित व ताजेतवाने झालों ! ता. ३१ रोजीं प्रातःकाळीं एस्बीआर्ज सोडून आह्मीं ब्रोरप येथें येऊन हॉटेलमध्यें राहिलों. ब्रोरपची वस्ती १२०० माणसांची असून हा गांव केवळ खेडे-

गांवासारखा लहान आहे. अशा ह्या लहानशा चिमुकल्या गांवामध्यें दोन मोठीं हॉटेल्स, दोन बँका आणि भाड्यानें फिरणाऱ्या नऊ मोटार गाड्या असल्याचें ऐकून आह्मांस आश्चर्य वाटलें! ब्रोरप पासून स्लेस्वीग फक्त चारच मैल दूर असल्यामुळें, आह्मीं चालत तेथपर्यंत गेलों. स्लेस्वीग प्रथम डेन्मार्कच्या ताब्यांत होतें, परंतु १८६४ च्या लढाईत तें जर्मनीकडे गेलें. ते हल्लीं इंटर नॅशनल कंट्रोलमध्यें असून लवकरच डेन्मार्कच्या ताब्यांत जाणार असल्याचें आह्मीं ऐकिलें. रस्त्यानें जात असतांना पुष्कळ डेनलोक आह्मांस भेटले. ते आह्मांकडे पाहून हास्यमुख करून टोपीस हात लावून अथवा टोपी उचलून सलाम करीत होते. डेनलोक सायकली फार वापरतात. स्लेस्वीगच्या भागाजवळ जाऊन व तो पाहून आह्मीं परत डेनिश सृष्टिसौंदर्याचें निरीक्षण करीत करीत परत आलों.

ब्रोरपहून नजिकच असलेलें लेडलुंड ॲग्रिकल्चर स्कूल (Ladelund Landboskolle) पाहण्याकरितां आह्मीं ता. १ एप्रिल रोजीं गेलों. या स्कूलच्या शिक्षकापैकीं मि. कॉनरेडी यांनीं आह्मांस संस्था दाखवून संस्थेसंबंधीं सर्व उपयुक्त

माहिती सांगितली. सहकारित्वाच्या तत्वार शंभर मेंबर लोक ही संस्था चालवितात. एक स्कूल बोर्ड नेमलेला असून शाळेस सरकारांतून ग्रांट मिळते. कृषिशास्त्र, जनावरांसंबंधीं रोग-विज्ञान वगैरे कृषिकर्मविद्येस जरूर आणि उपयोगी शिक्षण येथें देण्यांत येत असून डेअरीसंबंधीं स्वांतत्र शिक्षणही देण्यांत येतें. शिक्षणक्रम पांच पासून आठ महिन्याचा असून ज्यांनीं कृषिकर्म किंवा डेअरीमध्यें स्वतंत्र रीतीनें काम केलें आहे, अशा वीस वर्षांवरील वयाच्या विद्यार्थ्यांना येथें दाखल करण्यांत येतें. मात्र स्त्रियांना या शाळेंत दाखल करीत नाहींत. या संस्थेस जोडून असलेलें कृषिविद्येसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारें म्यूझियम, त्याचप्रमाणें संस्थेमधील गाई, डेअरीचे संचे वगैरे सर्व पाहून झाल्यावर आह्मीं मि. कॉनरेडी यांच्याकडे उपहाराकरितां गेलों. मिसेस कॉनरेडी व त्यांचीं मुलें यांच्याशीं रीतीप्रमाणें ओळख वगैरे झाल्यावर गप्पा गोष्टी करीत सर्वांनीं मिळून अल्पाहार केला. मिसेस कॉनरेडी या फारच सभ्य, नम्र, कुलीन आणि आदरातिथ्यतत्पर डेनबाई आहेत. एकंदरींत त्यांचें वर्तन कुलीन आर्यस्त्रीप्रमाणें

असल्याचें आह्मांस दिसून आलें. मि. कॉनेरडी हेहीं एक सभ्य, विद्वान्, हास्यमुख, आनंदी स्वभावाचे आणि आदरातिथ्यतत्पर व परक्या माणसांस शक्य तितकी माहिती मोठ्या हौसेनें देणारे सद्गृहस्थ आहेत. कृषिविद्येचें शिक्षण अल्पावधींत शेतकरी लोकांना देऊन शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग शेती सुधारण्याच्या कामीं कसा करून घेतां येतो, याची माहिती जाणण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं ही संस्था मुद्दाम पाहण्यास विसरूं नये.

ब्रोरपहून आह्मीं व्हेन येथें गेलों. व्हेननजीक असलेलें अॅस्कोव्हफोक हायस्कूल आह्मीं पाहिलें. येथील भाषाविषयाचे अध्यापक मि. हसेरुस यांनीं आह्मांस संस्था दाखवून सर्व माहिती सांगितली. प्रो. स्कूडर यांनीं ही संस्था प्रथम स्लेस्वीगच्या हद्दीमध्यें स्थापन केली होती. ती इ. स. १८८६ सालीं—हल्लींच्या ठिकाणीं आली. संस्थेस सरकाराकडून ग्रांट मिळत असते. शिवाय फीचें उत्पन्न मिळून संस्थेचा खर्च चालतो. गरीब विद्यार्थ्यांना सरकारकडून स्कॉलरशिप मिळ-

ण्याची व्यवस्था आहे. उच्च प्रतीचें शिक्षण देऊन व लोकांचीं मनें सुसंस्कृत करून, त्यांचा दृष्टिकोन वाढवून त्यांना राष्ट्राचे लायक घटकावयव व योग्य नागरिक तयार करण्याचा या संस्थेचा हेतु आहे येथें स्त्रीपुरुषांना एकत्र व सारखेंच शिक्षण देण्यांत येत असतें विद्यार्थी स्कूलच्या रेसिडेन्सीमध्यें राहतात व स्त्रिया निरनिराळ्या शिक्षकांचे घरीं त्यांच्या कुटुंबामध्यें राहून अभ्यास करितात या व्यवस्थेमुळें विद्यार्थ्यांना अल्पावधींत उपयुक्त शिक्षण संपादितां येतें. अभ्यासक्रम तीन टर्मचा असून प्रत्येक टर्म हिंवाळ्यामध्यें सुरु होत असल्यानें, शेती करणाऱ्या मनुष्यांचा शाळे-मध्यें प्रवेश होण्यास अडचण पडत नाहीं. हिंवाळ्यामध्यें शेगडीजवळ गप्पागोष्टी करण्यांत व्यर्थ जाणाऱ्या वेळेचा ह्याप्रमाणें सदुपयोग करण्यांत येत असतो. येथें परिक्षा बिलकूल नाहींत. खास ज्ञानाभिरुचीची लालसा धरून ज्ञानसंपन्न होण्याकरितां मेहनत करणाऱ्या स्त्रीपुरुषांना निरर्थक परिक्षांच्या चरकामधून पिळून काढण्याचें काय कारण आहे ? स्वतःच्या सवडीप्रमाणें येऊन कोणीही मनुष्य ज्ञान मिळवून येथून बाहेर पडल्यानंतर संपादित

ज्ञानाचा फायदा आपल्या देशबांधवांना देण्याचा प्रयत्न करीत असतो, असा या संस्थेचा आजपर्यंतचा अनुभव आहे. आपल्या हिंदुस्थान देशांत अशा प्रकारच्या संस्था निघतील, तर किती तरी बरें होईल ! या संस्थेमधील स्त्रीपुरुष विद्यार्थ्यांना व्यायाम हा अवश्यक विषय आहे, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. स्त्रियांकरितां कसरतशिक्षक स्त्री नेमलेली आहे. शरीर-संपत्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या माणसांच्या नेत्रामध्यें ही संस्था पाहून चांगलेंच अंजन पडतें. आम्हीं रेसिडेन्सी पाहत होतों, त्यावेळीं एका विद्यार्थ्याच्या खोलीमध्यें हिंदी कविवर्य डॉक्टर टागोर यांचें भव्य छायाचित्र आणि डेनिश भाषेमध्यें भाषांतर केली गीतांजली वगैरे ग्रंथ पाहून आम्हांस अत्यंत आनंद झाला. टागोरच्या ग्रंथाचें खास अध्ययन करणारा हा विद्यार्थी होता. डॉ. टागोरचे ग्रंथ साऱ्या जगामध्यें जसे लोकप्रिय आहेत, त्याप्रमाणें डेन्मार्कमध्येंही अतिशय लोकप्रिय असून, डॉ. टागोरच्या नवीन ग्रंथांची लोक मार्गप्रतिक्षा करीत असतात, असें जेव्हां येथें आम्हीं ऐकिलें, त्यावेळीं देशबंधू डॉक्टर टागोर

यांचें नांव जगांतील लहानमोठ्या देशोदेशीं प्रसिद्धीस येऊन व सर्वतोमुखीं झाल्याचें प्रत्यक्ष पाहून, हिंदमातेनें स्वतःच्या निकृष्ट आणि कंगाल स्थितीच्या वेळींही कविवर्य डॉ. टागोरससख्या पुत्ररत्नास जन्म देऊन आह्मां अखिल हिंदीजनांना धन्य केलें हे विचार मनामध्यें येऊन आम्हीं आनंदलहरीमध्यें घटकाभर तल्लीन होऊन गेल्यास नवल तें काय ?

शाळा पाहून झाल्यावर शेतकरी लोक कशाप्रकारें राहतात, तें पाहण्याचीं आमची मनीषा असल्यामुळें मि. जोस्ट नांवाच्या शेतकऱ्याच्या, त्याचप्रमाणें दुसऱ्याही दोन चार शेतकऱ्यांच्या घरीं आम्हीं जाऊन त्यांचीं घरें, जनावरें बांधण्याचे गोठे, शेतें वगैरे पाहिलीं. त्यांचें सविस्तर वर्णन न देतां थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं, हिंदुस्थानामध्यें दरमहा एक हजार रुपये पगार मिळविणाऱ्या अधिकाऱ्याच्या घरापेक्षांही हीं घरें चांगलीं असून, लांकडांच्या तक्तपोशीवर गालीचे पसरले होते; त्याचप्रमाणें पीयानो, लहान लायब्ररी, बाथरूम, किचन, बेडरूम, डायनिंगरूम, ड्राईंगरूम, गेस्टरूम

याप्रमाणें व्यवस्था असून, प्रत्येक ठिकाणीं टेलिफोन, विजेचे दिवे वगैरे आधुनिक सर्व सामुग्री व सुव-सोयीच्या वस्तूंनीं परिपूर्ण अशीं हीं घरें होतीं. जनावरें बांधण्याच्या जागीं देखील विजेच्या दिव्यांची सोय केलेली असून सर्व ठिकाणें अत्यंत स्वच्छ अशीं दिसलीं. ओलें खत संभाळून ठेवण्याच्या टांक्या, त्याचप्रमाणें नांगर वगैरे शेतीस उपयोगी सामान ठेवण्याचा स्टोअरही पाहण्यालायक होता. हें सर्व पाहून शेतकऱ्यांच्या संपन्न स्थितीची बरोबर कल्पना आह्मांस आली. सर्व शेत-कऱ्यांनीं मोठ्या उत्सुकतेनें आणि आनंदानें आह्मांस घरांतील खासगी भाग सुद्धां दाखवून आभारी केलें. पूर्वीं सूचना न देतां एकाएकी आम्हीं वरील ठिकाणीं गेल्यामुळें खरी स्थिति आह्मांस पाहावयास मिळाली.

व्हेनहून आम्हीं ओडेन्सी येथें गेलों. व्हेन स्टेशनवर एक मौजेची गोष्ट घडून आली. ज्या ट्रेननें आम्हीं जाणार होतों, ती ट्रेन एक्स्प्रेस होती. एक्स्प्रेस गाडींतून प्रवास करणाऱ्या मनुष्यास एक साधें तिकिट आणि एक एक्स्प्रेसच्या विशेष आकाराचें तिकिट ह्याप्रमाणें दोन

तिकिटें देण्यांत येतात, त्याची आम्हांस माहिती नव्हती. आह्मीं तिघेजण होतों, ह्मणून वरप्रमाणें स्टेशनमास्तर यांनीं आह्मांस सहा तिकिटें दिलीं स्टेशनमास्तरास इंग्रजी येत नव्हतें आणि आह्मांस डेनिश येत नव्हतें ! आह्मीं सहा-जण आहों असें समजून मास्तरानें आपणांस सहा टिकिटें दिलीं कीं काय, अशी शंका आम्हांस आल्यावरून हाताच्या बोटांनीं आम्हीं तिघेजणच आहों, असें स्टेशन मास्तरास कळविलें. मास्तरास आमच्या शंकेचें कारण समजून एक्स्प्रेस गाडीचीं तीन तिकिटें असल्याचें आम्हांस समजविण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला, परंतु आम्हांस तें कांहीं समजलें नाहीं व आम्हीं तिकिटें घेऊन प्लॅटफार्मवर गेलों. मास्तरानें इंग्रजी जाणणाऱ्या एका मनुष्यास थोड्याच वेळांत आमच्याजवळ आणिलें आणि त्याच्याकरवीं आमची समजूत घातली, तेव्हां सर्वत्र हंशा पिकला ! मास्तरही हंसले आणि आमचा गैरसमज दूर झाल्याबद्दल आनंदित होऊन व आम्हांस सलाम करून ते आपल्या कामास गेले हे लोक प्रवाशांच्या सुखसोईकडे, त्याचप्रमाणें प्रवाशांना यत्किंचित् देखील त्रास पडूं नये,

म्हणून किती दक्षता व काळजी बाळगितात, त्याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. कांहीं कारण नसतांना देखील रागावून उतारूंशीं बेपर्वाईनें वागणारे व खिडकी-मधून पैसे अंगावर फेंकून देऊन प्रवाशांना त्रास करणारे हिंदुस्थानांतील उद्दाम रेल्वे नोकर इकडील परिस्थिति पाहून शहाणें होतील आणि स्वतःचें वर्तन सुधारून सभ्यपणानें वागण्याचें जें स्वतःचें कर्तव्य त्याची जाणीव मनामध्यें ठेवतील, तर प्रवाशांना नाहक होणारा त्रास आणि तसदीचें कारण नाहींसें होऊन प्रवास आनंदकारक आणि सुखकारक होईल. परंतु हिंदुस्थानांतील रेल्वे नोकर ही साधी गोष्ट शिकतील किंवा रेल्वे कंपन्यांचे मालक त्यांना शिकवितील तेव्हां खरें !

ओडेन्सी हें एक पाऊण लाख वस्तीचें मोठें शहर असून येथील जनावरांचें मार्केट पाहण्यासारखें आहे. नजीकच डेलम लँडबोस्कल (शेतकीची शाळा) पाहण्यासारखी आहे. त्याचप्रमाणें हुसमस् स्कूलही पाहण्यासारखें आहे. हुसमस् स्कूल हें थोडी जमीन असलेल्या शेतकरी लोकांकरितां खास स्थापन केलें आहे. मि. लिंग

नांवाचे एक वयोवृद्ध आणि अत्यंत हुषार असे गृहस्थ या संस्थेचे डायरेक्टर आहेत, त्यांनीं आम्हांस सर्व प्रकारची माहिती दिली. मिसेस लिंगे ह्या त्यांना शोभतील अशा सुशील पत्नी आहेत. दोघांनींही आमचें आदरातिथ्य करून आम्हांस जेवावयास बोलाविलें ही संस्था सहकारित्वाचे तत्त्वावर चालली असून तीस एकरपेक्षां कमी जमिनीची मालकी असलेले शेतकरी येथें शिकण्याकरितां येतात. तीस एकरपासून दोनशें एकरपर्यंतच्या जमिनीचे मालक डेलमस्कूलसारख्या संस्थेंत शिक्षण संपादण्यास जातात. येथील अभ्यासक्रम, पुरुषांकरितां हिंवाळ्याच्या वेळीं पांच महिने आणि लग्नाच्या वयाच्या कुमारिकांकरितां उन्हाळ्यामध्यें पांच महिने याप्रमाणें असून, इतिहास, अर्थशास्त्र, कृषिविद्या आणि चालू राजकारण वगैरे विषयांचें शिक्षण देण्यांत येतें. याशिवाय स्त्रियांना गृहकृत्यांचेंही शिक्षण मिळतें. गरीब शेतकरी व त्यांच्या स्त्रियांकरितां सहा ते बारा दिवसांपर्यंतचे अभ्यासक्रम ठरविलेले असून शेतकऱ्यांना उपयुक्त आणि चालू राजकारणासंबंधीं शिक्षण देऊन जगामध्यें काय चाललें आहे,

शेतीवाडी सुधारण्यास काय केलें पाहिजे, वगैरे जरूर ती माहिती मिळते. राजकारण समजण्याची अंगीं पात्रता आणणें हें राष्ट्राचा घटकावयव या दृष्टीनें मनुष्याचें आद्यकर्तव्य येथें समजलें जातें.

डेलमस्कूल जवळच असलेलें एका अतिशय गरीब विधवा बाईचें घर आणि शेत आम्हीं पाहिलें. हें शेत तीन एकराचें होतें. शेताच्या एका कोंपऱ्यास तिचें राहतें घर असून घरामध्यें, ड्राइंगरूम, डायनिंगरूम, किचन, बेडरूम, पियानो आणि विजेच्या दिव्यांची व्यवस्था वगैरे सर्व आधुनिक साधनांनीं भरपूर असलेलें हें सुंदर घर पाहून आह्मीं तर आश्चर्यचकित व थक्कच झालों! तीन एकर जमिनीच्या मालकाच्या घरीं अशा प्रकारचें सामान पाहून व त्याच्या घरामध्यें लायब्ररी पाहून ह्या लोकांच्या उच्चतम राहणीची व त्यांच्या दांडग्या वाचनव्यासंगाची आम्हांस बरोबर कल्पना आली. जनावरें बांधण्याची जागा स्वतंत्र असून ती अतिशयच स्वच्छ होती. तेथेंही विजेच्या दिव्यांची व्यवस्था होतीच. गोठ्यांत तीन गाई व दोन डुकर होते. घोडा एकही नव्हता.

दुसऱ्याचे घोडे भाड्यानें ठेवून स्वतः शेताची मशागत करीत असल्याबद्दल त्या बाईनें आम्हांस सांगितलें. तीस कोंबड्या होत्या व त्यांचे खुराडे फारच स्वच्छ दिसले. शेतीचीं आउतें ठेवण्याची जागा स्वतंत्र असून तेथें सर्व आउतें व्यवस्थित रीतीनें ठेविलेलीं आमच्या पाहण्यांत आलीं. घराच्या बाजूस एक छोटेखानी उत्तम बाग असून त्याची जोपासना चांगल्या प्रकारें ठेवण्यांत आलेली दिसली. पिकांकरितां जमिनीचे निरनिराळे वाफे करण्यांत आलेले होते. तीन एकर जमीनीच्या मालकाचें वर वर्णन केलेलें घर आणि शेत पाहून आम्हीं तर आश्चर्यचकितच झालों व हिंदुस्थानांतील शेतकरीबंधूंची याप्रमाणें सुस्थिति होण्याचा सुदीन केव्हां प्राप्त होईल, असा विचार करीत सदर बाईचा निरोप घेऊन आम्हीं ओडेन्सी येथून कोपनहेगन शहरीं येऊन दाखल झालों.

कोपनहेगन येथील रेल्वेस्टेशन प्रेक्षणीय आहे. स्टेशनाच्या सर्व इमारतीच्या बांधणीमध्यें लांकडाशिवाय दुसऱ्या कशाचाहि उपयोग केलेला नाहीं. मोठमोठे खांब, तुळया

वगैरे सर्व लाकडांचे असून लोखंडी सामान त्यांत बिलकुल वापरलेलें नाहीं. कोपनहेगन हें खरें नांव नसून डेनिश भाषेमध्यें त्याचें नांव " कॉबन् हॅवन् " ह्मणजे " व्यापाऱ्यांचें नंदनवन " असें आहे. नांवावरून पाहतां कोपनहेगनमध्यें पूर्वीं फार मोठा व्यापार चालत असला पाहिजे, असें अनुमान निघतें. कोपनहेगन हें डेन्मार्कच्या राजधानीचें शहर आहे. स्टेशन बाहेरील रस्त्यांशिवाय शहरांतील इतर रस्ते बरेच अरुंद आहेत. मोठ्या रस्त्यावर विजेची ट्राम चालू असून फक्त एकाच रस्त्यावर मोटारबस पाहण्यांत आली. शहरांतील स्वच्छता आणि एकंदर बाह्य देखावा चांगल्या प्रकारचा होता. को-ऑपरेटिव्ह मिल्क सप्लाय कंपनी, प्यालेस लायब्ररी, हाऊस ऑफ रिप्रिझेन्टेटिव्ह, सीनेट हाऊस, ग्लिप्टोथेक स्कल्पचर गॅलरी, पॅनोप्टीकन, टाऊन हॉल, युनिव्हर्सिटी, ॲग्रिकल्चर कॉलेज, त्याचप्रमाणें कोपनहेगन जवळच लिंग्बी येथें असलेलें शेतकीसंबंधीं म्यूझियम व उघड्या मैदानामधील जुन्या देवळांच्या घरांचें रचनादर्शक म्यूझियम इत्यादि स्थळें अवश्य पाहण्यासारखीं आहेत. आह्मीं डेनिश

नाटकही पाहिलें. नाट्याभिनय वगैरे पाहतां या कलेमध्यें डेनिश लोकांची फारशी प्रगति झालेली दिसत नाहीं. एकंदरीनें पाहतां कोपनहेगन शहर औद्योगिक बाबतींत भरभराटलेलें असून भविष्यत्कालीं थोड्या अवधींतच तें चांगलें नांवालौकिकास येईल, असें वाटतें. कोपनहेगन येथें सरकारी अंमलदारांनीं कित्येक दिवसपर्यंत सदोदित आमच्या बरोबर राहून आह्मांस पाहिजे असलेली सरकारी कागदपत्रांमधील सर्व माहिती मोठ्या आनंदानें देऊन ऋणी केलें. इतकेंच नव्हें तर ज्या ज्या अधिकाऱ्यांशीं आमचा संबंध आला, त्या सर्वांनीं आह्मांस मेजवान्या देऊन आमचा बहुमान केला. त्यांच्या या आदरसत्काराबद्दल त्यांचे जितके आभार मानावे, तितके थोडेच होणार आहेत!

डेन्मार्क देश सोडण्यापूर्वीं, हा देश पाहून आमच्या मनावर जो परिणाम झाला त्यासंबंधीं दोन शब्द लिहिल्यास वावगें होणार नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें या देशांतील शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या, प्रथमपासूनच ह्याप्रमाणें स्थिति होती किंवा नंतर झाली, सुधारणा मागाहून झाली असल्यास

ती कोणत्या मार्गाच्या अवलंबनानें व कशा प्रकारें झाली, ह्या सुधारणा घडवून आणण्याचे कामीं प्रजेकडून व सरकाराकडून कोणकोणते प्रयत्न करण्यांत आले, सारांश शेतकरी वर्ग चांगल्या स्थितीमध्यें कोणत्या उपायानें आला, ह्या प्रश्नांचें समाधानकारक उत्तर आपणांस मिळालें तरी त्यावरून त्यांच्या प्रयत्नाच्या दिशेची आपणांस कल्पना होईल वे तेच प्रयत्न आपणांस आपल्या देशांतही मार्गदर्शक होण्यास अडचण पडणार नाहीं.

फार प्राचीनकाळीं उन्नतीच्या शिखरावर पोहोंचलेलीं ग्रीस व रोमसारखीं अनेक राष्ट्रें आज विपन्न स्थितीप्रत जाऊन चक्रनेमिक्रमेण ह्या नियमास अनुसरून नामशेष झालीं आहेत. हिंदुस्थान देशही एकेकाळीं उन्नतीच्या शिखरावर होता. आज त्याचें पूर्ववैभव नष्ट झालें आहे. पूर्वी ज्यांचीं नांवें ऐकून सुद्धां कोणास माहित नव्हतीं, अशीं नवीन नवीन राष्ट्रें स्वपराक्रमानें उदयास येऊन सुधारलेल्या राष्ट्रांबरोबर, जगामध्यें वावरूं लागलीं आहेत. सन १७८१ पूर्वी डेन्मार्कमधील शेतकऱ्यांची स्थिति हिंदुस्थनांतील सध्यांच्या शेतकरी बंधूंच्या स्थिती-

प्रमाणें, किंबहुना त्याहूनही निकृष्ट होती, असें म्हटल्यास चालेल. आपल्याप्रमाणेंच इकडील लोक लहान लहान खेड्यांतून राहात होते. प्रत्येक शेतकऱ्याची सर्व जमीन एके ठिकाणीं नसे. ती गांवाच्या शिवेमध्यें,किंवा चारही बाजूस दूर दूर पसरलेली व विस्खळित असल्यामुळें, राखणजोखण, शेतकीचीं आउतें एका ठिकाणांहून दुसऱ्या ठिकाणीं मालाची नेआण करण्यामध्यें होणारा कालापव्यय, शेतामध्यें राहण्याकरितां घरांची सवड नसल्यामुळें खताचें वगैरे होणारें नुकसान, राखणजोखणीस पडणारी अडचण, त्याचप्रमाणें जमिनीच्या लहान लहान धांदोट्या व चिंध्या झाल्यामुळें जीं लहान शेतें झालीं होतीं, त्या प्रत्येक शेताच्या हद्दीमध्यें व्यर्थ जाणाऱ्या जमिनीमुळें होणारें नुकसान आणि शेतें लहान असल्यामुळें, नवीन प्रकारच्या शास्त्रीय व सुधारलेल्या आउतांचा उपयोग करण्याचे कामीं येणाऱ्या अडचणी वगैरे अनेक कारणांनीं शेतकऱ्यांची स्थिति फारच निकृष्ट आणि कंगाल झालेली होती. लोक निव्वळ दरिद्री बनले होते. डेन्मार्क सरकारास ही लोकस्थिति फारच अनिष्ट वाटली. हिंदु-

स्थानाप्रमाणेंच डेन्मार्क हा देशही शेतकीवर अवलंबून असल्यामुळें वर सांगितलेली अनिष्ट स्थिति फार दिवस चालू राहिल्यास, देशाची दुर्दशा होईल ही गोष्ट डेन्मार्क सरकारच्या लक्ष्यांत आल्यावरून, इ. स. १७८१ सालीं जमिनीचे लहान लहान तुकडे एके ठिकाणीं करून प्रत्येक शेतकऱ्यांस एकाच ठिकाणीं स्वतंत्रपणें जमीन मिळेल, अशी व्यवस्था करण्याकरितां एक कायदा पास करून तो अमलांत आणण्यास प्रत्यक्ष सुरुवात केली. परंपरागत चालत आलेली रूढि किंवा स्थिति कितीही वाईट असली तरी त्या स्थितींतच संतोष मानून राहण्याकडे मानवी-स्वभावाची प्रवृत्ति असल्यामुळें व कोणतीही सुधारणा करण्याच्या प्रयत्नांना प्रथमतः सर्वत्र विरोधच होतो, ही गोष्ट देशोदेशींच्या इतिहासाच्या अवलोकनावरून आपणांस दिसून येते. डेन्मार्कमध्येंही याचप्रमाणें झालें. लोकांनीं वरील कायद्याविरुद्ध जोरानें पुकारा केला. परंतु देशाची स्थिति सुधारण्याची डेन्मार्क सरकारची तीव्र इच्छा असल्यामुळें, सरकारनें रयतेच्या विरोधास न जुमानतां, कडक रीतीनें कायद्याचा अंमल केला. शेतकऱ्यांना एके

ठिकाणीं जमिनी मिळाल्यामुळें ते शेतावरच स्वतःचीं घरें बांधून शेती करूं लागलें व गरजू शेतकऱ्यांना सरकार-मधून द्रव्य साहाय्यही देण्यांत आलें. या व्यवस्थेमुळें शेतकरी वर्गाची स्थिति फार लवकर सुधारली. सुधारणेचें कार्य एका दिवसामध्यें किंवा क्षणामध्यें होत नसतें तें यशस्वी होण्यास शतकेंच्या शतकें वाट पाहावी लागते. वरील सुधारणा करण्यास डेन्मार्कला शंभर वर्षें परिश्रम करावे लागले. आज दीडशें वर्षांनंतर हें काम बहुतेक पुरें होत आलें असलें तरीही अद्याप तें चालूच आहे. सुधारणेचीं मधुर फळें चाखावयाची एकदां चटक लागली म्हणजे त्याच सुधारणाविरुद्ध प्रथम करण्यांत आलेल्या विरोधांचा लोप आपोआप होऊन लोक त्या सुधारणेचें समर्थन करूं लागतात व प्रागतिक बनतात. डेन्मार्कलाही हाच अनुभव आला. लोकांनीं एकजुटीनें सरकाराशीं सहकारित्व करून देशाच्या सर्वांगीण उन्नतीच्या कामीं मनःपूर्वक साहाय्य केलें. प्रत्येक शेतकरी स्वतःच्या एकाच ठिकाणीं असलेल्या शेतावर व स्वतःच्या घरीं राहात असल्यामुळें, शेतीचें काम-काज, राखणजोखण, खत, जनावरांची देखरेख इत्यादि

सर्व कामें चांगल्या प्रकारें होऊं लागलीं आणि निरर्थक जाणाऱ्या वेळेचा उपयोग शेतामध्यें मेहनत मशागत करण्याच्या कामीं होऊं लागला लहान लहान तुकडे एकत्र केल्यामुळें शेतांचें क्षेत्र वाढलें व अशा मोठ्या शेतावर सुधारलेल्या आउतांचा व यंत्रांचा उपयोग करण्यास सोईचें झाल्यामुळें शास्त्रीय पद्धतीचा शेतकी सुधारण्याच्या कामीं चांगला उपयोग होऊं लागला व त्यामुळें शेतकीची पैदास दिवसेंदिवस वाढूं लागली.

कोणत्याही समाजाची काय किंवा देशाची काय, उन्नति एकाच मार्गानें होत नसते व ती उन्नति एकांगी असूनही चालत नाहीं. सर्व बाबतींमध्यें सर्वांगीण उन्नति झाली तरच ती श्रेयस्कर असते नाहींपेक्षां एकाच बाबतींतील उन्नति मनुष्यास होणाऱ्या " एलिफंटा " रोगाप्रमाणें केवळ हास्यास्पद ठरेल. एक सुधारणा झाली ह्मणजे दुसरी सुधारणा हातीं घ्यावी, असें कित्येकांचें मत आहे. वरील मताचें प्रतिपादन करणें ह्मणजे बालकाच्या शरीरसंपत्तीची पूर्ण वाढ झाल्यानंतर त्याच्या मानसिक उन्नतीकडे लक्ष द्यावें, ह्या विचित्र मताचा पुरस्कार करण्यासारखें

हास्यास्पद आहे ! ज्याप्रमाणें बालकांची शारीरिक, नैतिक, मानसिक, इत्यादि प्रकारची वाढ एकदम झाली पाहिजे, त्याचप्रमाणें सर्व प्रकारच्या सुधारणाही एकाच वेळीं झाल्या पाहिजेत. डेन्मार्कमध्येंही त्याचप्रमाणें झालें. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यामुळें सातपासून चौदा वर्षें वयाच्या डेनिश बालकांना व्यवहारोपयोगी शिक्षण मिळूं लागलें. शिवाय या शिक्षणाबरोबरच शेतकीसंबंधाचेंही उपयुक्त शिक्षण देण्यांत येऊं लागलें. इसापनातीमधील किंवा अशाच प्रकारच्या इतर पुस्तकांमधील कुत्र्या-मांजरांच्या गोष्टींच्या वचनानेंच शिक्षणाची इतिश्री करण्यांत आली नाहीं. देशाचा मुख्य उद्योग शेतकी, त्याचें ज्ञान आवश्यक विषयामध्यें राखून त्याचें अध्यायन विद्यार्थ्यांकडून करून घेतलें. शेती आणि डेअरी यांच्या खास शिक्षणाकरितां देशांतील लोकांनीं आणि सरकारनें सहकार्यानें निरनिराळ्या ठिकाणीं वरील शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्यामुळें, लोकांना शास्त्रीय शिक्षण मिळूं लागलें. वर ज्या एक दोन संस्थांचें वर्णन दिलें आहे, त्यावरून वाटेल त्या वयाच्या आणि वाटेल त्या स्थिती-

मधील स्त्रीपुरुषांना शेतीचें उपयुक्त शिक्षण कसें मिळतें, त्याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. ह्याप्रमाणें मिळालेल्या शास्त्रीय शिक्षणाचा उपयोग शेतकी सुधारण्याच्या कामीं होऊं लागला. परिक्षा नसल्यामुळें लोक केवळ ज्ञान मिळविण्याच्या हेतूनेंच पुढें येऊं लागले. प्रजेची शरीरसंपत्ति सुदृढ राखण्याकरितां स्त्रीपुरुषांना सारख्याच रीतीनें व्यायाम मिळेल, अशी ही व्यवस्था करण्यांत आली सहकारी पतपेढ्या स्थापन करून शेतकऱ्यांना हलक्या व्याजानें व बिनप्रयासानें पैसे मिळण्याची तजवीज करण्यांत आली. शेतकऱ्याच्या मालकीच्या बँका स्थापन करून त्यांच्या लहानमोठ्या शाखा सर्व ठिकाणीं उघडण्यांत आल्या व फार दूर न जातां स्वतःच्या घराजवळ पैसे मिळण्याची तजवीज झाली. खासगी रीतीनें व्याजबट्ट्याचा धंदा करणाऱ्या व आपल्या भयंकर व्याजानें शेतकरी वर्गाला पिळून काढणाऱ्या लोकांपासून गरीब शेतकऱ्यांची मुक्तता करण्यांत आली. बीं, खतें, शेतीचीं आउतें इत्यादि शेतीस उपयुक्त अशा वस्तु खरेदी करण्याकरितां, त्याचप्रमाणें शेतीची पैदास, अंडीं, डुकरें इत्यादींची विक्री करण्याकरितां निरनिराळ्या

शेतकरी संस्था स्थापन करण्यांत आल्या. त्यामुळें प्रत्येक शेतकऱ्यास बाजारामध्यें माल घेऊन जाण्याचें व विकत आणण्याचें कारणच उरलें नाहीं. हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, सट्टे करणारे लोक, कापसास पानें फुटण्यापूर्वींच कापसाची खरेदी करून शेतकऱ्यांना हलक्या भावानें पैसे देऊन त्यांच्या हातावर तुरी देऊन जसें फसवितात, तसें इकडे बिलकूल होत नाहीं. कारण, ह्या शेतकरी संस्था जगांतील बाजारभाव कोठें कसा आहे त्याची माहिती काढून ज्या ठिकाणचा बाजारभाव अधिक असेल, त्या ठिकाणीं मालाची विक्री करून होतांहोईल तितका जास्त नफा मिळण्याच्या कामीं तत्पर असल्यानें प्रत्येक शेतकऱ्याच्या मालाची किफायतीनें विक्री होऊन त्यास चांगलाच नफा होतो. लोकांना राजकारणाची माहिती मिळत असल्यानें त्यांचीं मनें संकुचित न राहतां, त्यांच्या विचारशक्तीला चालन मिळतें. सहकारी चळवळीनें लोक परस्परांचे उपयोगी पडूं लागल्यामुळें त्यांच्यामध्यें ऐक्य वाढलें व एकमेकांसंबंधीं सहानुभूति उत्पन्न झाली. डेनिश लोकांचा स्वभाव मायाळु, सहानु-

भूतियुक्त असून अंतःकरण निर्मल आणि विश्वासु असल्यामुळें, सहकारित्वाच्या कामीं या त्यांच्या बहुमोल गुणांचा उपयोग तर झालाच, पण उलट हे गुण त्यांच्यामध्यें जास्त वाढून ऐक्याची वाढ फार उत्तम रीतीनें झाली. सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार झाल्यानें, आणि लोकांना धंदारोजगार भरपूर मिळाल्यानें, गुन्हे करण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस आपोआप कमी झाली. इतकेंच नव्हें, तर आजमितीस गुन्हे जवळ जवळ नाहींतच ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पोलिसखात्याकडे होणाऱ्या खर्चाचा बोजा राष्ट्राच्या डोक्यावरून कमी झाला व पोलिसांची संख्या फारच कमी होऊन ती केवळ नांवचीच राहिली. ठरल्यावेळीं लष्करभरती करण्यापलिकडे पोलिसला दुसरा उद्योग राहिलेला नाहीं. कारण, गुन्हे होण्याचें बहुतेक बंद झालें आहे. डेनिश स्त्रियांनाही शिक्षण मिळत असल्यामुळें, घरसंसार चालविण्याच्या कामांत पुरुषांना त्यांची मदत होते, इतकेंच नसून संसाराच्या कामाचा मुख्य बोजा त्यांच्यावरच पडतो, असें आह्मीं ऐकिलें. सुशिक्षित, सुशील, सुदृढ, विनयशील अशा डेनिश स्त्रिया, गृहीणीपद चांगल्या

प्रकारें भूषित करून मातृपदाची जबाबदारी उत्तम रीतीनें पार पाडतात. जगांतील इतर लोकांपेक्षां आदरातिथ्याच्या बाबतींत डेनिश स्त्रीपुरुषांचा चांगलाच लौकिक असल्यामुळें, परक्या माणसाच्या मनावर त्याचा सुपरिणाम होऊन त्यांच्या संबंधीं प्रेमभावना उत्पन्न झाल्याखेरीज राहत नाहीं.



प्रकरण ४ थें.

जर्मनी, हॉलंड, बेल्जम आणि फ्रान्समधील प्रवास.

आदरातिथ्यतत्पर आणि हास्यमुख अशा डेनबंधूंच्या प्रेमळ स्वभावाचें वारंवार स्मरण करीत डेन्मार्कहून आम्हीं जर्मनीच्या उत्तर किनाऱ्यावर असलेल्या वार्नमुंड बंदरीं येऊन पोहोंचलों. हें बंदर जरी बरेंच मोठें आहे, तरी आम्हीं उतरलों त्यावेळीं बंदरावर किंवा स्टेशनवर मनुष्याची राहदारी किंवा इतर कोणत्याही प्रकारची गडबड दिसली नाहीं. हें बंदर पाहतांच गेल्या महायुद्धामुळें जर्मन राष्ट्रामध्यें आलेल्या दुर्बलतेची साक्ष आम्हांस ताबडतोब पटली. आगगाडीमधून आम्हीं हॅम्बर्जकडे निघालों. येथील रेल्वे गाड्या डेन्मार्कमधील गाड्यांपेक्षां मोठ्या, अधिक वेगानें चालणाऱ्या आणि विशेष सोईच्या होत्या. जर्मन शेतकरी जमीन नांगरण्याचें वगैरे शेतीचें काम करीत

असलेले दिसले. शेतामध्यें जर्मन स्त्रियाही काम करीत होत्या. जर्मन लोक फारच कष्टाळू आहेत असें ह्मणतात. या देशांतील जमीन चांगली सुपीक आणि डेन्मार्कमधील जमिनीपेक्षां चांगली दिसत होती. त्याचप्रमाणें ठिक-ठिकाणीं रक्षित जंगलांचे भाग दिसत होतें. सृष्टिसौंदर्य रम्य होतें, तरी त्यावरही खिन्नतेची छटा दिसत होतीच !

हॅम्बर्ज शहर हें जगांतील प्रसिद्ध बंदरांपैकीं एक बंदर व लढाईपूर्वी व्यापार उद्योगाचें मोठें ठाणें होतें. बिस्मार्कचा भव्य दगडी पुतळा, म्यूझियम, झूऑलाजिकल गार्डन्स, पॅनॉप्टीकन इत्यादि स्थळें येथें पाहण्यासारखीं आहेत. पॅनॉप्टीकनच्या वरील भागीं मनुष्यजातीच्या ॲनॉटॉमि (शरीररचने) ची माहिती व गुह्येंद्रियांना हो-णाऱ्या अनेक विकारांचें हुबेहुब चित्र डोळ्यांपुढें आणणारें वॅक्सवर्कचे (मेणांच्या आकृत्या बनवून केलेलें) प्रदर्शन प्रत्येक प्रवाशानें अवश्य पाहण्यास विसरूं नये. ऐन तारुण्याच्या भरांत विकारवश आणि कामांध बनून क्षणिक सुखाच्या इच्छेनें प्रेरित होऊन केलेल्या चुकीचें प्रायश्चित्त

आमरण मनुष्याला कशा प्रकारें भोगावें लागतें, त्याची कल्पना हें प्रदर्शन पाहिल्यानें होते व तें प्रत्येक प्रवाशानें अवश्य पाहावें, अशी आह्मीं पुन्हां एक वेळ शिफारस करितों.

आह्मीं हॅम्बर्ज शहरामध्यें प्रवेश केला त्या वेळीं तेथें उद्योग-धंद्याचें कांहींच चिन्ह आह्मांस दिसलें नाहीं. रस्त्यामधून जाणारे येणारे जर्मन लोक फारच अशक्त, खिन्न आणि अस्थिपंजरासारखे दिसत होते. कोणाही मनुष्याच्या चेहऱ्यावर हास्य दिसत नव्हतें. अतिशय उपासमारीमुळें तरुण माणसेंही म्हाताऱ्या माणसाप्रमाणें रस्त्यानें चालत होतीं. लढाईच्या कटु फळांचा स्वाद या भूमीस बरोबर मिळाल्याचें दिसलें. भस्मीभूत झालेले मृत जिवंत होऊन जणू अर्ध्या जळून गेलेल्या स्वतःच्या अस्थिपंजरांनिशीं इकडून तिकडे फिरत आहेत, अशा स्मशानभूमीप्रमाणें आह्मांला हॅम्बर्ज शहराचा भयप्रद देखावा वाटला! येथील एक जर्मन नाटक आह्मी पाहिलें. जर्मन भाषेमधील एक शब्द देखील आह्मांस कळत नव्हता, तरी नाटकामध्यें नाट्या-भिनय इतका हुबेहुब आणि उत्तम होत होता कीं, नटांच्या

चेहेऱ्यावर त्यांच्या हृदयामध्यें चाललेल्या सर्व विकारांचें आविष्करण बरोबर होत असल्यामुळें, सर्व नाटकाचें संविधानक आह्मांस चांगल्या प्रकारें समजलें ह्मटल्यास हरकत नाहीं. नाट्यशास्त्रामध्यें जर्मन लोकांची कोणी बरोबरी आजमितीस करूं शकेल, असें आह्मांस वाटत नाहीं.

हॅम्बर्जहून निघून हॉलंडमधील ओडेन्झाल शहराहून आह्मी ॲमस्टरडाम येथें येऊन पोंचलों. ओडेन्झालपासून तों ॲमस्टरडामपर्यंतच्या प्रदेशामध्यें चांगली सुपीक जमीन दिसली नाहीं. बहुतेक भागामध्यें गवताखेरीज दुसरें कांहीं नव्हतें. ठिकठिकाणीं डच जनावरें चरत असलेलीं पाहण्यांत आलीं. शेतांच्या चाऱ्ही बाजूंस पाण्यांचे पाट वाहात होते.

ॲमस्टरडाम हें हॉलंडमधील मोठें बंदर असून, शहरामधील सर्व रस्ते व्हेनिस शहराप्रमाणें, ठिकाठिकाणीं पाण्याच्या प्रवाहांनीं विभागले होते. जिकडे तिकडे पाणी पसरलेलें होतें व त्यावरून लहान लहान बोटी इकडून तिकडे फिरत होत्या. यामुळें सर्व शहर पाण्यामध्यें जणूं तरंगत

आहे कीं काय, असा भास होत होता. रस्ते साधारणतः रुंद होते. वर सांगितलेल्या जलप्रवाहांतील पाणी कित्येक ठिकाणीं बिघडलेलें असून त्याचा दुर्गंध लांबवर पसरला होता. उष्ण प्रदेशामध्यें इतकी दुर्गंधी झाल्यास त्यापासून भयंकर रोग उद्भवल्यावांचून राहणार नाहींत. गांवामध्यें विजेच्या ट्रामगाड्या फिरत होत्या. ह्या ट्रामगाड्यावरील तारेच्या मध्यभागीं मोठ्या आंकड्यांमध्यें नंबर लिहिले असल्यामुळें, दुरून अमुक नंबरची ट्राम येत आहे हें सहज समजूं शकतें. हे नंबर याच देशामध्यें फक्त पाहण्यांत आले. हॉलंडमध्यें येणाऱ्या प्रत्येक प्रवाशास चोवीस तासाचे आंत स्वतःचे दोन फोटो व पासपोर्ट पोलिस ठाण्यामध्यें दाखवून आइडेंटिफिकेशन कार्ड मिळवावें लागतें, त्याप्रमाणें आह्मींही केलें होतें. हॉलंड सोडतेवेळीं सरहद्दीवर तें कार्ड द्यावें लागतें. ॲमस्टरडाम हें मोठें शहर असून तेथील व्यापार चांगला भरभराटींत असलेला आमच्या पाहण्यांत आला. राणीचा महाल (Queen's palace) प्रेक्षणीय असून तो प्रथम शहराच्या म्युनिसिपालिटीनें

टाउन हॉलकरितां बांधला होता, यावरून म्युनिसिपालटीच्या सांपत्तिक स्थितीची चांगली कल्पना होईल. पूर्वी उद्योगधंद्याचे बाबतींत डच लोक पाश्चात्य राष्ट्रांमध्यें अग्रण्य होते, हें इतिहास प्रसिद्ध आहे. येथील म्यूझियम उत्कृष्ट असून पाहण्यासारखें आहे. तेथें उत्तम शिल्प कामें, त्याचप्रमाणें रेम्ब्रांट, रुबेन, लिओनार्ड व्हिन्सी, हॅन्डाईक, स्कॉटल, डॉबिनी, रुसो, डेविड, इत्यादि नामांकित पेन्टरांचीं पेंन्टिंग्ज खास पाहण्यासारखीं आहेत. येथें असलेलें रेम्ब्रान्टचें जगविख्यात पेंन्टिंग " नाइट वॉच " पाहिल्यावर त्याच्या चित्रकला आणि रंगकलापटुत्वाची चांगली कल्पना आह्मांस आली. ॲम्स्टरडाम येथील रेम्ब्रान्टचें घर पाहण्यास पुष्कळ प्रवासी जातात. ज्यू लोकांचा रहाण्याचा वसतिभाग पौर्वात्य प्रवाशांनीं अवश्य पाहण्यासारखा आहे. या भागामधून जातांना मुंबईच्या नळबाजारामधून किंवा चोरबाजारामधून आपण जात असून जणूं हिंदुस्थानामध्येंच फिरत आहों, असा किंचित्काल भास झाला.

ॲम्स्टरडाम शहराजवळच झँडाम नांवाचें एक लहान गांव आहे. तेथें रशियाचा झार पीटर दि ग्रेट हा एका लहानशा लांकडाच्या घरामध्यें साधारण मनुष्याप्रमाणें राहून जहाजें बांधण्याचें काम शिकला व त्यानें रशियामध्यें आरमार बांधण्याचें काम सुरू केलें व उत्तम आरमार बांधून आपल्या देशास बलवान् राष्ट्रांच्या मालिकेंत गोंविलें. पाऊसपाणी त्याचप्रमाणें इतर कारणांनीं या घराचा नाश होऊं नये म्हणून त्यावर दुसरें एक चांगलें मजबूत घर बांधून लोकांना दाखविण्याकरितां जतन करून ठेवलें असलेलें आह्मीं पाहिलें. आपल्या राष्ट्रास उन्नतदशा प्राप्त करून देण्यासाठीं पीटर दि ग्रेटसारखे थोर पुरुष सामान्य स्थितींत मजुराप्रमाणें कष्ट सहन करितात, तेव्हांच राष्ट्राचा उद्धार होत असतो. स्वतःच्या ऐषआरामांत किंचित् कमीपणा न पडूं देतां फुकटचें वाक्पांडित्य करून समाजसुधारणा, देशसुधारणा, किंवा राष्ट्रोद्धार होत नसतो. " स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः " याप्रमाणें वृत्ति ठेऊन कार्य केलें तरच समाजकार्य, देशकार्य किंवा

राष्ट्रकार्य साध्य होतें व देशोदेशींच्या इतिहासावरून हीच गोष्ट आपणांस पुनः पुनः पाहावयास मिळते.

ॲम्स्टरडाम सोडून हेग (डच भाषेमध्यें याचा उच्चार हाग करितात) येथें जाण्यासाठीं आह्मीं निघालों हार्लेम-पासून लागडेनपर्यंतच्या रेल्वे ट्रेनमधून दृग्गोचर होणाऱ्या देखाव्याचें बक्षीस निसर्गतः या डच भूमीशिवाय इतरांना मिळालेलें नाहीं. टॅयुलीप, हायसिंथसारखीं (बल्ब) पुष्पें इतर देशांमध्यें क्वचित् ठिकाणीं होत असतील. परंतु हॉलंडसारखे बल्ब जगांतील इतर कोणत्याही देशामध्यें होत नाहींत ही गोष्ट खरी. या देखाव्याचें वर्णन करण्याचें काम केवळ आमच्या शक्तीबाहेरचें आहे. कवित्वाचि स्फूर्ति ज्याच्या हृदयामध्यें फार नसतां किंचित् जरी असेल किंवा स्फूर्तीचा अल्पांश असेल तरी हा देखावा पाहून त्यावर तो एक मोठें काव्य लिहूं शकेल. किंवा रेम्ब्राटसारख्या वर्णकलापटूला रंगमिश्रणासंबंधीं माहिती द्यावयाची असल्यास तीही ह्या देखाव्यांवरून मिळूं शकेल. रेम्ब्रान्टसारखे चित्रकला आणि रंगकलापटु आपल्या अप्रतिम कौशल्यानें प्रसिद्धीस

येऊन अजिंक्य व अतुल झाले, त्याची गुरुकिल्लीहि कदाचित् ह्या बल्ब पुष्पांच्या मनोहर देखाव्यावरून रंग-मिश्रणासंबंधीं त्यांना मिळालेल्या ज्ञानाचाच परिणाम असावा, अशीही कल्पना आमच्या मनामध्यें आली. कित्येक मैल दूरवर शुभ्र, लाल, नारंगी, गुलाबी, किरमिजी, अस्मानी वगैरे अनेक सुंदर रंगांच्या पुष्पांचे ताटवे पाहून, रंगमिश्रणच्या सौंदर्यानें भरलेला रंगीबेरंगी जणूं भव्य गालीचाच पसरला आहे, असा नयनमोहर देखावा पाहून प्रवाशांच्या मनास अत्यंत आल्हाद होत होता. कोणत्याही कारणांनीं त्रस्त झालेल्या मानवी मनास हा देखावा पाहून आनंद व उल्हास वाटल्यावांचून राहवयाचा नाहीं ! मानवी कौशल्यानें बनलेल्या वस्तूंसंबंधीं मनुष्य वाटेल तितकी फुशारकी मारीत असला तरी, निसर्गासिद्ध वस्तूंच्या पुढें त्याचें सर्वोत्तम काम किंवा वस्तू एकाद्या क्षुःपदार्थाप्रमाणेंच दिसेल, यांत शंका नाहीं. हें देखाववैचित्र्य पाहून घटकाभर विधात्याची कुशलता आणि कारागिरी याची कल्पना करीत व

त्याच्या महत्तेचा विचार मनामध्यें येऊन आनंदसागरांत आम्हीं निमग्न झालों !

यानंतर आम्हीं हेग शहरीं गेलों. हेग हें औद्योगिक भरभराटीचें मोठें बंदर असून हॉलंडच्या राजधानीचें मुख्य शहर आहे. शहरामधील रस्ते अरुंद आहेत. तथापि बाहेरील बाजूचे चांगले प्रशस्त व रुंद आहेत. हेग येथें मॉरिट्स्वीझ पिक्चर गॅलरीमध्यें बर्निर, डाऊ, रेम्ब्रान्ट, कोरॉट, ट्रुस्ट इत्यादि पेन्टरांचीं चित्रें पाहण्यासारखीं आहेत. येथील नाइट् हॉल (लोकप्रतिनिधी सभामंडप) आम्हांस पाहावयास मिळाला. तेथील द्वारपालानें आह्मीं हिंदी आहों हें ओळखून कविवर्य डॉक्टर टागोरच्या ग्रंथांसंबंधीं माहिती प्रथम आह्मांस विचारली व आपला अभिप्राय सांगून डॉक्टर टागोर यांचे ग्रंथ पाश्चात्य ग्रंथांपेक्षांही जास्त आवडीनें हॉलंडमध्यें वाचले जातात, असें सांगितलें. येथील गॅव्हनपूर्ट (Gavenpoort) नांवाच्या एका जुन्या तुरुंगांत राजद्रोहासारखे भयंकर गुन्हे करणाऱ्या अपराध्यांना

देहांत शासन देण्यांत येत असे. हा तुरुंग पाहून लंडन येथील टॉवर ऑफ लंडनची आह्मांस आठवण झाली. मेस्टॉग म्यूझियम, म्युनिसिपल म्यूझियम आणि पॅलेस ऑफ् पीस इत्यादि ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. प्रसिद्ध अमेरिकन धनाढ्य अँड्र्यू कर्नेजी यांनीं राष्ट्रांराष्ट्रांमधील लढायांचा निर्णय समाधानकारक रीतीनें व्हावा, या हेतूनें इंटर नॅशनल पीस कॉन्फरन्सच्या सभासदांकरितां हा राजवाडा बांधून दिला आहे. हा राजवाडा फारच भव्य आणि सुंदर असून निरनिराळ्या राष्ट्रांनीं स्वतःच्या देशांत होणाऱ्या सर्वोत्तम वस्तूंची देणगी त्याच्या बांधणीप्रीत्यर्थ दिलेली असल्यामुळें, निरनिराळ्या राष्ट्रांतील उत्तम आधुनिक वस्तु येथें पाहावयास मिळतात. राष्ट्रांराष्ट्रांमधील लढ्यांचा शांतपणानें निकाल न होतां त्यांचें पर्यवसान महायुद्धासारख्या भयंकर लढाईत होतें, त्यावरून पूर्वपरंपरेनें चालत आलेल्या नियमास विसावें शतकही अपवादात्मक बनूं शकलें नाहीं, हें मानवी सुधारणेच्या भवितव्यतेच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट होय ! लीग ऑफ नेशन्स ही एक याच दिशेनें प्रयत्न करणारी संस्था

आहे. परंतु तिच्या प्रयत्नांना सध्यां कितपत यश येईल, याची साक्ष कदाचित् भविष्यकालीं पटेल. आतापर्यंतच्या इतिहासावरून चालू राजकारणामध्यें या संस्थांचा व्हावा तसा उपयोग झालेला दिसत नसल्यामुळें, भविष्यकाळीं होणाऱ्या गोष्टींसंबंधीं चर्चा करण्यांत कालापव्यय करणें इष्ट नाहीं.

डेन्मार्कमध्यें ज्या प्रयत्नांनीं शेतकऱ्यांची स्थिति सुधरली, त्याच प्रयत्नांनीं हॉलंडमधील शेतकऱ्यांचीही स्थिति सुधरली. हॉलंडमध्यें रेकुमेशन वर्क्स (समुद्राचें पाणी हटवून जमीन उपयोगांत घेण्याचें काम) आणि हार्टिकल्चर हीं जास्त पाहण्यांत आलीं. मिनिस्ट्री ऑफ् ॲग्रिकल्चरकडून (शेतकी खात्यांतील अमलदारांकडून) जरूर ती माहिती मिळाल्यावर त्याच खात्यांतील एक बडे अधिकारी, शेतकरी लोक स्वतःचा माल कशा प्रकारें विकतात, तें दाखविण्याकरितां, तेथील एका बाजारामध्यें (डेपो) आह्मांस घेऊन गेले. अशा प्रकारचें मालविक्रीचे डेपो आमच्या पाहण्यांत पूर्वीं आलेले नसल्यामुळें वाचकांकरितां त्यांची थोडक्यांत येथें माहिती देतों :—

माल विक्रीकरितां पुष्कळ सहकारी मंडळें स्थापन झालीं असून त्या मंडळांकडून मालाच्या विक्रीचें काम होत असतें. ठिकठिकाणीं डेपो उघडण्यांत आलेले आहेत. अनुकूल डेपोमध्यें, शेतकरी लोक कनालमधून लहान लहान बोटींतून माल घेऊन जातात. हॉलंडमध्यें असे लहान लहान कनाल असंख्य असल्यामुळें, अशा लहान बोटींतून माल नेणें फार सोईचें पडतें. डेपोमध्यें कनालच्या एका बाजूस नाटकगृहांतील जागेप्रमाणें गिऱ्हाइकांना बसण्याची व्यवस्था केली आहे. प्रत्येक गिऱ्हाइकाच्या बसण्याच्या जागेवर विजेचें एक बटन असून त्याचा संबंध, कनालच्या दुसऱ्या बाजूस ठेवलेल्या घड्याळासारख्या एका मोठ्या यंत्राशीं असतो. या यंत्रावर एकपासून शंभरपर्यंत आंकडे लिहिलेले असून त्याच्या तबकडीवर घड्याळाच्या कांट्या-सारखा एक कांटा फिरत असतो. माल कनालमधून जातेवेळीं यंत्रावरील कांटा फिरविण्यांत येतो. मागणी करणाराची इच्छा असेल त्या आंकड्यावर कांटा आला म्हणजे मागणी करणारा मनुष्य आपल्या जागेवरील बटन

दाबतो. तसें केल्यानें यंत्रावरील आंकडा प्रकाशित होऊन जागेवरील नंबराचीही तेथें माहिती होते. या योजनेनें कोणी किती रकमेपर्यंत मागणी केली, तें सहज समजून येतें. याप्रमाणें लिलांवाचें काम होत असल्यामुळें, यत्किंचित्‌ही गडबड होत नाहीं. मागणी झालेल्या रकमेस आपला माल द्यावयाचा किंवा नाहीं, तें मालकाऱ्या मर्जीवर असल्यामुळें, शेतकऱ्यांचें नुकसान होण्याचा संभव नसतो. सर्व शेतकऱ्यांचा माल एके ठिकाणीं आल्यामुळें सरसनिरस मालाची माहिती होऊन जो तो आपआपला माल उच्च प्रतीचा ठरविण्याविषयीं प्रयत्न करीत असतो. सर्व शेतकऱ्यांना बाजारभाव आणि शेती-संबंधीं इतर जरूरीची माहिती संस्थेकडून निघणाऱ्या साप्ताहिक वगैरेंच्या द्वारें मिळत असते. जितक्या मालाची विक्री होईल त्यावर साडेचार टक्याप्रमाणें रक्कम संस्थेचा खर्च चालविण्याकरितां मेंबरास द्यावी लागते, व खर्च वजा जातां राहिलेली रक्कम संस्थेचीं जरूरीचीं कामें करावयाचीं नसतील तर विक्रीच्या प्रमाणानें ज्याची

त्यास परत देण्यांत येते. मागणी करणारांना तर लिलांवाच्या वेळीं संप करतां येत नाहीं. कारण, संस्थेस बाजारभावाची पूर्ण माहिती असल्यामुळें कदाचित् मागणी करणारांनीं संप केला, तरी संस्थेचे चालक तो माल त्यांना न विकतां बाहेरगांवीं पाठवून देतात. यामुळें मागणीदारांचा संप चालत नाहीं हिंदुस्थानांतील शेतकरी बधूंना अनेक प्रकारच्या अडचणी नडतात. त्यांमध्यें, बाजारपेठेंत मालास योग्य भाव मिळण्याची एक मोठी अडचण आहे. शेतकऱ्यांना बाजारभावाची माहिती नसल्यामुळें, पुष्कळ वेळां त्यांचा माल निव्वळ चोरावारी विकला जातो. मालाच्या किंमतीप्रमाणें त्यांस पैसे मिळत नाहींत. त्यामुळें, सरकारचा सारा भरण्यापुरतेही त्यांना पैसे न मिळतां त्राहि त्राहि होऊन जातें. वर सांगितलेल्या संस्थांची आपल्या हिंदुस्थानामध्यें फार जरूर असल्यामुळें, तशा प्रकारच्या संस्था स्थापन करून शेतकऱ्यांना होणारा त्रास थोडा फार तरी कमी केला पाहिजे.

हेगहून निघाल्यावर रॉटरडामवरून बेल्जममधील अँटवर्प शहर पाहून आम्हीं ब्रुसेल्स शहरीं आलों.

बेल्जममधील शेतीची त्याचप्रमाणें इतर सर्वसाधारण स्थिति, आतांपर्यंत आह्मीं पाहिलेल्या देशांपेक्षां चांगली असून, लोकही चैनी असल्याचें दिसलें. महायुद्धाचा दुष्परिणाम या देशावर झाल्याचें आमच्या आढळण्यांत आलें नाहीं.

ब्रुसेल्स शहरांमध्यें, हाऊसीस ऑफ पार्लमेंट, स्पॅनिश किंग्ज पॅलेस, टाऊन हॉल, लेस फॅक्टरी इत्यादि स्थळें पाहण्यासारखीं असून आर्ट गॅलरी पुष्कळच मोठी आहे. सदर गॅलरीमध्यें, कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या मजुराचे व वानहो यानें केलेल्या निग्रो लोकांचे पुतळे आणि प्रसिद्ध पेन्टरांचीं चित्रें पाहण्यासारखीं आहेत. प्रख्यात पेन्टर रुबेन याचें "Assumption of the medona" नांवाचें विख्यात पेन्टिंग येथें आहे. विरोधी रंगाचा मोठ्या कौशल्यानें योग्य स्थळीं उपयोग करून त्याची अवर्णनीय छाप दृष्टिगोचर करण्याचें रुबेनसारखें चातुर्य इतर फारच थोड्या चित्रकारांमध्यें दिसून येईल.

चैन व ऐषआरामामध्यें निमग्न असलेलें ब्रुसेल्स शहर

सोडून आम्हीं रेल्वेनें फ्रान्सकडे वळलों. समृद्ध बेल्जम देशाची सरहद्द ओलांडल्यावर आमचा फ्रान्समधून प्रवास सुरू झाला. फ्रान्सच्या उत्तरेकडील जमिनी सुपिक दिसत नव्हत्या. या प्रदेशांतून जात असतां महायुध्याचा भयंकर देखावा आमच्या डोळ्यांसमोर दिसूं लागला! आमची गाडी जसजशी एकामागून एक स्टेशनें सोडून पुढें पुढें जाऊं लागली, तसतसें अनेक लहानमोठे उध्वस्त झालेले गांव दिसूं लागले. विमानांतून फेंकलेल्या गोळ्यांनीं घरांचीं छपरें तुटून भिंतींमध्यें मोठमोठीं खिंडारें पडलेलीं दिसलीं. कित्येक ठिकाणीं उध्वस्त झालेल्या मोठमोठ्या घरांच्या देखाव्यावरून येथें पूर्वीं गांव असावा, याची कल्पना होत होती. विटा मातीच्या पडलेल्या ढिगां-शिवाय गांव असल्याचें चिन्ह दुसरें कांहींच दिसत नव्हतें. आगगाडीचे व दुसरे असंख्य पूल तुटलेले पाहण्यांत आले. लष्करी कँपांचे अस्ताव्यस्त पडलेलें अनेक प्रकारचें सामान, तारांचे गठ्ठे वगैरेंचे प्रचंड ढीग दिसत होते. त्याचप्रमाणें ट्रेंचिस व त्यासारख्याच इतर जमीन पोखरून

तयार केलेल्या बचावाच्या असंख्य जागा पाहण्यांत आल्या. नवीन इमारती बांधण्यास, पूल उभे करण्यास व अशाच प्रकारच्या कामांस द्रव्य, मेहनत आणि वेळ किती तरी लागतो. परंतु त्यांचा विध्वंस करण्याचें काम मात्र क्षणभरांत होतें! स्वतःच्या दृष्टीनें रानटी समजणाऱ्या पौर्वात्य लोकांना, त्यांच्या आसुरी कृत्यांसाठीं शिव्या देणारीं पाश्चात्य राष्ट्रें, स्वतःच्या या अधम आणि अमानुष कृत्यांचें समर्थन कोणत्या आधारावर करितील व विसाव्या शतकामधील स्वतःच्या सुधारणेची शेखी जगापुढें कोणत्या तोंडानें मिरवितील, तें समजत नाहीं! मोठमोठ्या भौतिक शास्त्रांचा शोध करून व अनेक नवीन यंत्रें शोधून त्यांचा उपयोग मानवजातीचें सुख वाढविण्याकडे न होतां, संहार करण्याकडेच झाला, असें या महायुद्धाच्या पलयावरून समजावयास काय हरकत आहे? सुधारणेचें अंतिम ध्येय आत्मोन्नति नसतां जर मानवांच्या संहारामध्यें असेल—मग ती सुधारणा पौर्वात्य असो किंवा पाश्चात्य असो—अशा सुधारणेचा संपर्कही आपणांस

न होईल तर बरें! वसुधैव कुटुंबकम् हें तत्व शब्दामध्यें प्रतिपादणारी व सुधासंहाराचा अंगिकार कृतीमध्यें करणारी पौर्वात्य अथवा पाश्चात्य सुधारणा स्वतःच्या पवित्र स्पर्शानें आम्हांस पावन न करील तर बरें. महायुद्धामुळें झालेल्या संहाराचें घाणेरडें चित्र पहात पहात उद्विग्न मनानें आम्हीं पॅरिस शहरीं येऊन दाखल झालों.

पॅरिस शहराचें वर्णन आजपर्यंत अनेक हिंदी प्रवाशांनीं जनतेपुढें मांडलें असल्यामुळें, त्याची पुनरुक्ति करणें योग्य होणार नाहीं. उत्कृष्ट बांधणी आणि सौंदर्य या बाबतींत पॅरिस शहर सर्व जगामध्यें उच्चप्रतीचें आहे. तेथील रस्ते आंखल्याप्रमाणें व बाणासारखे सरळ आहेत. पॅरिसमध्यें विशेष पाहण्यासारखीं ठिकाणें म्हटलीं म्हणजे रॉयल ऑपेरा हाऊस, ल्यूर म्यूझियम, पँथीयन, ट्रोकॅडेरो, नेपोलियन टुम्ब पॅरिस, ॲकॅडेमीच्या इमारती, नॉटरडॅम चर्च, सेंट जर्विस, बॅस्टिलीयन, पॅलेडीलक्झेम्बर्ज म्यूझियम डिक्निी, एफियल टॉवर, आर्च डि ट्रायंफ, श्याम्स डी एलीशीस, बुल्वर्डस आणि सीन नदीवरचे निरनिराळे

पूल त्याप्रमाणें सर्वांत मोठा पूल पॉंट आलेक्झांडर दि थर्ड, प्लेस डि लॉ कांकर्ड इत्यादि ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. लूर म्यूझियम तर फारच मोठें असून तें सर्व चांगल्या प्रकारें पाहण्यास निदान आठ दिवस तरी पाहिजेत. आणि तें संपूर्ण पाहिल्याशिवाय त्याची बरोबर कल्पनाही येणार नाहीं. एफियल टॉवरची उंची ९८४ फूट आहे. लिफ्ट-मध्यें बसून वर जातां येतें. या टॉवरवरून आजुबाजूच्या ५० मैलपर्यंतचा देखाव चांगल्या प्रकारें दिसतो. पॅरिस शहर सर्व्हेच्या एकाद्या नकाशाप्रमाणें व घरें–इमारती व रस्त्यानें जाणाऱ्या मोटरगाड्या, आगगाड्या इत्यादि, लहान मुलांच्या खेळण्याप्रमाणें दिसतात. टॉवरवर फलाहाराची व्यवस्था असून करमणुकीकरितां लहान लहान नाटकें व खेळही करून दाखविण्यांत येतात. टॉवरच्या एकंदर पायऱ्या एक हजार सातशें आहेत. इ. स. १८८९ मध्यें पॅरिस प्रदर्शनाचे वेळीं हा टावर बांधण्यांत आला. सर्व जगामध्यें इतका उंच टॉवर दुसरा नाहीं, असें म्हणतात. टॉवरचे तीन मजले असून तिसऱ्या

मजल्याची उंची जमिनीपासून ९०५ फूट आहे. शिखरावर ध्वजा फडकत असून वायरलेस टेलिग्राफच्या तारा जोडलेल्या आहेत. गेल्या लढाईच्या वेळीं ह्या टॉवरचा चांगला उपयोग झाल्याचें आमच्या ऐकिवांत आलें. आर्च डि ट्रायंफपासून निरनिराळे बारा रस्ते फुटून निरनिराळ्या दिशेनें जातात, त्याचा देखाव आर्चवरून फार चांगला दिसतो.

लंडनच्या हाइडपार्कप्रमाणेंच, परंतु त्याच्यापेक्षां उत्तम अशी शॅम्स डी एलिशीस ही पॅरिसमध्यें हिंडण्याफिरण्याची व हवा खाण्याची जागा आहे

लूअर म्यूझियम हें यूरोपमधील फार मोठें म्यूझियम असून पाश्चात्य राष्ट्रांतील सर्वोत्कृष्ट म्यूझियमचा हा एक नमुन्यालायक आदर्श आहे, असें ह्मटल्यास अतियोक्ति होणार नाहीं. ह्या म्यूझियमधील ॲपोलो गॅलरीमध्यें असलेलें मौल्यावान जडजवाहीर खास पाहण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें रेम्ब्रान्टसारख्या प्रसिद्ध चित्रकारांचीं चित्रें लूअरमध्यें पाहावयास ठेविलीं आहेत. प्रसिद्ध चित्रकार लिओनार्ड व्हिन्सी याचें सुप्रसिद्ध पेन्टिंग " मोनालीसा "

हे आह्मांस पाहावयास मिळालें. हें पेंन्टिंग येथून एकाएकीं अदृश्य झालें होतें. परंतु तें थोड्याच वर्षांपूर्वीं इटली देशामध्यें मिळालें व हल्लीं तें लूअरमध्यें आपली प्रथमची जागा अलंकृत करीत आहे. ह्या चित्रामध्यें चेहऱ्यावर अंतःकरणामधील मनोविकारांचें आविष्करण इतक्या चांल्या रीतीनें झालें आहे कीं, ज्यास चित्रकलेचें फारसें ज्ञान नाहीं अशा मनुष्यासही त्याची प्रशंसा केल्यावांचून राहवत नाहीं. लूअरच्या मॅरिटाईम म्यूझियममध्यें आतांपर्यंत नौकाशास्त्राची प्रगति कशा प्रकारें झाली, त्याची ऐतिहासिक माहिती मोठमोठ्या नमुन्यांचें प्रदर्शन करून दाखविली आहे. पुराणवस्तुभांडारामध्यें, व्हीनस डि मिलोची अर्धा हात तुटलेली प्रतिमा विशेष पाहण्यासारखी आहे. सारांश, लूअर म्यूझियम पाहण्यामध्यें शांतपणानें एखादा आठवडा घालविण्यांत आल्यास तो कालापव्यय न होतां पाहणारास अनेक प्रकारची उपयुक्त माहिती त्यापासून मिळेल यांत शंका नाहीं.

पॅरिसनजीक फान्टेन्ब्ल्यू, व्हर्सेल्स इत्यादि ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. व्हर्सेल्सचा राजवाडा प्रसिद्ध असून राष्ट्रांराष्ट्रांमधील अनेक तहनामे येथें झाल्यामुळें

ह्या व्हर्सेल्सनें आजपर्यंत अनेक वेळां एकट्या फ्रान्सच्याच नव्हें तर सर्व यूरोपच्या आणि पर्यायानें जगाच्या भविष्याची दिशा ठरवून दिली, हेंही स्थलमहात्म्याचें एक अजब उदाहरणच नव्हें काय? ह्या व्हर्सेल्सची स्थानदेवता, ह्या स्थळाचा गतेतिहास पाहून आजपर्यंत जगाला नाचविण्य.सारख्या किती तरी गोष्टी येथें झाल्या असतील, त्याची कल्पना करीत व यापुढेंही अशा प्रकारच्या आणखी किती उलाढाली येथें होतील याबद्दल अनेक विचार आमच्या मनांत उद्भवले.

व्हर्सेल्स येथील बाग पाहण्यासारखा असून एकाग्र चित्तासाठीं आणि कवित्वाच्या स्फूर्तीकरितां अनुकूल अशी ही जागा आहे. फ्रान्समध्यें सृष्टिसौंदर्य अवर्णनीय आहे असें जें ह्मणतात, त्याची साक्ष हा बाग पाहिल्यानें मिळते.

मार्सेल्समध्यें फ्रेंच लोकांसंबंधीं झालेला आमचा अभिप्राय कायम असल्यानें त्यांच्या स्वभावाचें निरीक्षण करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. गेल्या लढाईच्या वेळीं फ्रान्स देशाचें फारच नुकसान झाल्याचें प्रवासाच्या वेळीं आमच्या पाहण्यांत आलें. त्या लढायांची पुनरावृत्ति निदान यापुढें तरी न झाल्यास जग किती तरी सुखासमाधानानें नांदेल !

प्रकरण ५ वें.

उपसंहार.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून पाश्चात्य देशांसंबंधीं थोडी फार कल्पना वाचकवर्गास आली असेलच. सविस्तर वर्णन करावयाचें झटल्यास प्रत्येक देशाच्या वर्णनाचा एक मोठा स्वतंत्र ग्रंथच व्हावयाचा! वेळेचा अभाव, कामाकाजाचा बोजा, किंवा इतर अनेक कारणांमुळें पाश्चत्य देशांसंबंधीं माहिती उपलब्ध असणाऱ्या मोठमोठ्या ग्रंथांचें वाचन ज्यांना शक्य नाहीं, अशा वाचकवर्गा-करितां हें छोटेखानी पुस्तक लिहिलें असल्यामुळें, विशेष उपयुक्त तितकीच माहिती देण्यांत आली आहे. विस्तृत माहिती मिळविण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आज-पर्यंत अनेक हिंदी लेखकांनीं लिहिलेल्या ग्रंथांचें अवलोकन केल्यास त्यांची इच्छा तृप्त होईल. या लहानशा पुस्तकांत

संक्षेपानें जें वर्णन केलें आहे, त्यावरून वाचकवर्गांना साधारण जरूरीची माहिती मिळण्यासारखी आहे.

ज्या ज्या देशांमध्यें आह्मीं प्रवास केला, त्या त्या सर्व ठिकाणीं आह्मांस चांगल्या प्रकारचा मान मिळाला आणि सर्वतोमुखीं हिंदुधर्माची तारीफ आणि वाखाणणी होत असलेली आमच्या ऐकण्यांत आली. प्राचीन संस्कृतीच्या बाबतींत हिंदमातेचें, नांव जगामध्यें प्रसिद्ध आहे. या देशांतील निरनिराळ्या व लहान मोठ्या लोकांशीं हिंदभूमीच्या गतवैभवासंबंधीं बोलत असतां अनेकवेळीं आमच्या मनामध्यें खेद उत्पन्न झाला! ज्यांनीं भूतकालीं स्वतःच्या अतुल पराक्रमांनीं आपलें नांव अजरामर केलें व ज्यांच्या नांवाचा यशोदुंदुभि आजमितीसही सर्व जगामध्यें दुमदुमत आहे, अशा आपल्या पुण्यश्लोक पूर्वजांचे वंशज होण्याचा मान ज्यांना मिळाला त्या आह्मां हिंदवासीयांना साभिमान धन्यता वाटल्याशिवाय राहावयाची नाहीं, हें स्वाभाविक होय. आमचे पूर्वज महान् पराक्रमी होऊन गेले आणि त्यांचे वंशज असूनही आज आमची

कंगाल स्थिति झाली आहे! पूर्वजांच्या किर्तीशिवाय स्वतःची योग्यता दाखविण्याचें कांहींच साधन आपणांजवळ नसल्यामुळें, बाहेर वडिलांच्या किर्तीचे गोडवे गाऊन त्यांच्या नांवावरच विकले गेल्याशिवाय गत्यंतर नसल्यानें, महाराष्ट्र कविवर्य साधु रामदास यांनीं "सांगे वडिलाची कीर्ति तो एक......" ह्मटल्यप्रमाणें सध्यां आपली शोचनीय स्थिति झाली आहे! हा दैवदुर्विपाक नव्हें तर दुसरे काय?

इकडील सामाजिक रीतिरिवाजांच्या बाबतींत आपल्या देशांतील लोकांचा गैरसमज झाल्याचें दिसून येतें. त्याचप्रमाणें खाण्यापिण्याचे बाबतींतहि कित्येक गैरसमज प्रचलीत असल्याचें दिसतें. पाश्चात्य देशांमध्यें थंडी फार असल्यानें, मद्यपानासारख्या ताज्य पदार्थांचें सेवन केल्याशिवाय चालत नाहीं, असा एक सर्वसाधारण समज झालेला दिसतो; पण तो अगदीं चुकीचा आहे. इकडील हवेंत मद्य आणि मांसाहार केल्याशिवाय चालत नाहीं, अशी कित्येक लोकांची समजूत आहे. परंतु येथें पुष्कळसे

हिंदी लोक व कित्येक यूरोपियनहि वनस्पती आहारावरच राहतात व तसें केल्यानें त्यांच्या शरीरसौख्यास कांहींच अडचण न पडतां प्रकृतीहि चांगली राहते. "मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयोः" सर्व आधार मनावर आहे. धूम्रपान करण्याचें किंवा विडी ओढण्याचेंहि कांहीं कारण नाहीं. मेजवानीच्या वेळींही मद्यपान केलें नाहीं तरी चालण्यासारखें असतें.

इकडे सुशिक्षित व अशिक्षित समाजामध्यें उच्च नीच स्थितीच्या लोकांचे निरनिराळे वर्ग असतात. हिंदुस्थानामध्यें निरनिराळ्या जातींनीं समाजाचें वर्गीकरण झालें आहे. इतर कित्येक देशांमध्यें निराळ्या धोरणावर समाजाची रचना झालेली पाहण्यास मिळते. हिंदुस्थानांतील असो किंवा जगांतील कोणत्याही देशांमधील असो, ज्या प्रकारच्या मनुष्याचीं संगत घडते त्या मनुष्याच्या स्वभावाची, चालीरीतींची वगैरे छाप मनावर पडून वाईट गोष्टींचा परिणामहि त्यास अनुसरूनच होत असतो. पाश्चात्य देशांमध्यें नवीन मनुष्य जातो, त्यावेळीं प्रथ

चोहोंबाजूस दिसणाऱ्या गौरतनु लोकांच्या देखाव्यामधून चांगल्या वाईटाची पारख त्याच्या हातून एकाएकीं होणें कठीण असतें. अशा वेळीं लोकांच्या ओळखी करण्यासंबंधांत घाई करण्याचें कारण नाहीं. थोड्याच अवधींत चांगल्या वाईटाची परीक्षा करण्याचें ज्ञान प्राप्त होतें. अशा वेळीं होतांहोईतों चांगल्या लोकांच्या ओळखी कराव्यात, म्हणजे त्यांच्यापासून आपणांस उपयुक्त माहिती मिळून आपल्या ज्ञानामध्येंही भर पडेल. हिंदुस्थानांतील कांहीं तरुण मंडळी, शॉप गर्ल्स किंवा अशाच हलक्या प्रकारच्या लोकांबरोबर उपवनें, बगीचे वगैरे ठिकाणीं हिंडतां फिरतांना केव्हां केव्हां पाहण्यांत येते, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. या बाबतींत मुख्य दोन गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. एक तर स्वतः चांगल्या लोकांच्या समागमामध्यें येऊन ज्ञान मिळवून स्वदेशास परत गेल्यानंतर त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या देशबांधवांना आणि पर्यायानें राष्ट्राला होईल अशा हेतूनें ज्ञानसंपन्न लोकांशींच अधिक संबंध ठेवणें.

आणि दुसरी महत्वाची गोष्ट ही कीं, आपण ज्या वेळीं परक्या देशामध्यें जातो, त्या वेळीं परकीय लोक आपणांकडे व्यक्ति या दृष्टीनें न पाहतां, हिंदी राष्ट्राचा एक अवयव या दृष्टीनें पाहात असल्यामुळें, आपल्या वर्तनानें आपल्या राष्ट्राच्या नांवास काळीमा लागेल अशा प्रकारचें वर्तन आपण कधींही न ठेवतां, आपल्या राष्ट्राच्या नांवास साजेल असेंच सोज्वल वर्तन ठेविलें पाहिजे. ह्या दोन गोष्टी मुख्यत्वें-करून ध्यानांत ठेऊन परकीय समाजामध्यें वागल्यास त्यापासून पुष्कळच फायदा होईल.

मातृभूमीस परत गेल्यानंतर स्वतः मिळविलेली माहिती आपल्या देशबांधवांना दिली पाहिजे. स्वतःच्या देशामध्येंही केवळ परकीयांसारखे राहून पाश्चात्य लोकांप्रमाणें त्यांच्याच मातृभाषेमध्यें शब्दोच्चार करणारे बांधव देशाच्या दुर्दैवानें कांहीं थोडथोडके नाहींत. स्वतःच्या देशबांधवांपासून फटकून वागून, टेनिस कोर्ट किंवा अशाच दुसऱ्या खेळण्यासंवरण्याच्या जागेवरच ज्यांच्या आयुष्यक्रमाची इतिश्री व्हावयाची असेल, त्यांनीं विदेशास जाऊन

द्रव्याचा अपव्यय न करणें बरें. अशा लोकांपासून देशास काय फायदा ? " आपणांस जें जें ठावें। तें तें हळू हळू शिकवावें। शहाणें करुनी सोडावें। सकल जना ॥ " ह्या महाराष्ट्र कविवर्य साधु रामदासाच्या उक्तीप्रमाणें ज्यांच्या वर्तनाची दिशा असेल, असेच लोक परदेशीं जाऊन ज्ञान मिळवून आले तर त्यांच्याप्रीत्यर्थ खर्च झालेल्या पैशाचें सार्थक झालें असें ह्मणतां येईल. केवळ परदेशगमनानेंच सर्वस्वीं मनुष्य ज्ञानसंपन्न होतो, अशी कोणाची कल्पना असल्यास ती चुकीची होय. परदेशांतील स्वसंपादित ज्ञानाचा उपयोग आपल्या देशबांधवांच्या उन्नतीकडे करणें, यांतच खरें सार्थक आहे.

विलायतेंत जाण्यास अनुकूल वेळ कोणती आणि प्रतिकूल कोणती, ही गोष्ट ज्याच्या त्याच्या कार्याच्या दिशेवर अवलंबून राहील. विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव इतकें सांगणें अवश्य आहे कीं, इकडे येण्यापूर्वीं ज्या संस्थेमध्यें आपणांस दाखल व्हावयाचें असेल, त्या संस्थांच्या चालकांशीं पत्रव्यवहार करून संस्थेमध्यें दाखल

होण्याची प्रथमपासूनच सोय करून ठेवावी. असें न केल्यास कदाचित् संस्थेमध्यें जागा न मिळून वेळ विनाकारण जाण्याचा संभव असतो. सर्व तयारी करून सप्टेम्बर महिन्यामध्यें विलायतेस जाऊन पोहोंचतां येईल, अशा बेतानें निघाल्यास बरें. जगाचा अनुभव ज्यांना थोडा फार आला आहे, अशा हुषार मनुष्यांना पाठविण्यांत आल्यास विशेष उपयोग होण्याचा संभव आहे. कारण, अशा मंडळींना आपल्या समाजास व देशास ज्या वस्तूंची जरूर आहे त्याचें ज्ञान असल्यामुळें, त्या दृष्टीनें अध्ययनाची दिशा ठरवून विशेष जरूरीचें ज्ञान ते संपादन करतील. दुबार वेळ घालवावयाचा नसेल, तर आपल्या तेथें मॅट्रिक किंवा पुढील परीक्षा पास झाल्यावर विद्यार्थ्यांना इकडे पाठविण्यास हरकत नाहीं. ज्यांचे नैतिक संस्कार अतिशय उच्च प्रतीचे आहेत अशा विद्यार्थ्यांशिवाय इतर बालविद्यार्थ्यांना कोणत्याही सबबीवर पाठविण्यापूर्वी बराच विचार करावा.

पाश्चात्य देशांतील स्त्रियांची शरीरसंपत्ति फारच हृष्ट-

पुष्ट आणि मजबूत अशी पाहून आपणांस आश्चर्य वाटल्या-खेरीज राहत नाहीं. अशा निरोगी व सशक्त शरीरसंपत्तीचीं कारणें शोधून काढण्यास दूर जावयास नको. सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यामुळें सर्व लहान बालकांना शाळेमध्यें जावें लागतें. शाळेमधील अभ्यासक्रमाचा स्मरणशक्तीवर बोजा न पडतां, लहान मुलेंही मोठ्या आनंदानें शिकतील अशा प्रकारच्या अभ्यासक्रमाची तजवीज केलेली असते. मुलांमुलींना लहानपणापासून शारीरिक शिक्षण मिळत असल्यामुळें, शेवटपर्यंत त्यांची शरीरयष्टि मजबूत राहते. " शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् " शरीर चांगलें तर जग चांगलें. परंतु आपल्या देशांतील शिक्षणक्रम निराळा ! परिक्षेसाठीं घोकंपट्टी करून स्मरणशक्तीचा नाश होतो, व सार्वत्रिक सक्तीच्या शिक्षणाच्या आभावामुळें सर्वत्र अज्ञा-नांधकार पसरला आहे. जेथें शिक्षणाची सोय आहे, तेथें स्त्रियांना शारीरिक शिक्षण देण्याची व्यवस्था क्वचित्च दृष्टीस पडते राष्ट्राच्या माताच जर अशक्त असल्या, तर त्यांच्या पोटीं वीररत्नें पैदा होतील, अशी आशा बाळगणें

व्यर्थ आहे! सार्वत्रिक सक्तीचें शिक्षण सुरू करून स्त्री-पुरुष उभयतांनाहि शारीरिक शिक्षण अवश्य दिलें पाहिजे. पडद्यासारख्या हानिकारक रूढींचा नायनाट करून स्वच्छ हवेचा-निसर्गानें फुकट दिलेल्या वस्तूचा-उपयोग त्यांना करूं दिला पाहिजे. आर्यमातांचें चारित्र्य जगामध्यें सर्वश्रेष्ठ असल्यानें घराच्या कोंपऱ्यामध्यें त्यांना कोंडून ठेवण्याचें कारण नाहीं. सीता, तारा, यांसारख्या स्त्रिया ज्या आर्यभूमीमध्यें निर्माण झाल्या, त्या आर्य स्त्रियांच्या चारित्र्यासंबंधीं साशंक राहण्याचें कारण नाहीं देशाची अवनति अनेक कारणांनीं झाली आहे. त्यांत स्त्रियांची शारीरिक अवनति हें एक मुख्य कारण आहे. स्त्रियांना शारीरिक, धार्मिक, नैतिक, राजकीय व संसारोपयोगी वगैरे प्रकारचें सर्वांगीण शिक्षण देऊन सर्व कार्यांमध्यें त्या भाग घेऊं लागतील, असें केलें पाहिजे. हिंदुस्थानच्या तीस कोटी लोकसंख्येपैकीं निम्मे स्त्रीवर्ग बहुतेक अज्ञानांधःकारांत घोरत पडला असल्यामुळें, राष्ट्र दिशाभूल झालेल्या व तुटलेल्या नौकेप्रमाणें इतस्ततः गटंगळ्या खात राहिल्यास आश्चर्य नाहीं. शिक्षणाच्या बाबतींत केवळ पाश्चात्य पद्धतीचेंच

अनुकरण करण्याचें कारण नाहीं. आपल्या देशकाल परिस्थितीकडे लक्ष देऊन स्त्रियांकरितां शिक्षणक्रम ठरविला पाहिजे. तथापि पाश्चात्य पद्धतींतून आपणांस अनुकूल अशा सर्व गोष्टीही आपण घेतल्या पाहिजेत. " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः " याप्रमाणें जोंपर्यंत भारतवर्षामध्यें स्त्रिया अदर्शनीय समजल्या जात होत्या, तोंपर्यंत सीता, तारामती, गार्गी, वाचक्नवी इत्यादि चारित्र्यवान् आणि आदर्शनीय स्त्रिया निर्माण झाल्या व त्यांनीं आपलें नांव अजरामर करून ठेविलें. योग्य दिशेनें शिक्षण दिल्यास आपल्या भगिनी आणि कन्या, गार्गी, वाचक्नवी, सीता, तारा, यांच्या योग्यतेस चढणें अशक्य आहे काय?

जगाच्या इतिहासाचें अवलोकन केल्यास कोणत्याही राष्ट्राची उन्नति त्याच्या औद्योगिक भरभराटीखेरीज होत नाहीं, ही गोष्ट आपल्या निदर्शनास आल्यावांचून राहत नाहीं. जें राष्ट्र औद्योगिक बाबतींत पुढें आहे, (मग त्याच्याजवळ लष्करी सामुग्री फार असो किंवा नसो) तेंच जगाच्या राजकारणांत अग्रस्थान पटकाविल्याखेरीज राहणार नाहीं. जपानचें उदाहरण आपणांस एशिया-

खंडांतच पाहावयास सांपडतें. जपानची सत्ता हिंदुस्थानावर नाहीं. परंतु व्यापाराचे योगाने जपाननें एकट्या हिंदुस्थानावरच काय पण जगांतील अन्य राष्ट्रांवरहि व्यापारी स्वामित्व मिळविलें आहे. राष्ट्रास साहित्यकुशल लोकांची व प्रतिभासंपन्न कवींची जरूर असतेच; तथापि नुसत्या साहित्यकुशल किंवा कवींनींच भागत नाहीं. विश्वविद्यालयीन पदवीधरांची संख्या सुदैवानें दिवसेंदिवस वाढत आहे. तथापि औद्योगिक शिक्षणाकडे अद्यापि व्हावी तशी लोकांची प्रवृत्ति झालेली नाहीं. व्यापार, हुन्नरकला इत्यादिसंबंधीं पाश्चात्य देशांमध्यें पुष्कळ शिकावयास मिळतें. यासाठीं वरिष्ठ सरकार, राजेरजवाडे व इतर धनिक लोकांच्या आश्रयानें आमचे तरुण बांधव औद्योगिक शिक्षण संपादन करून, पाश्चात्य देशांतील संस्थांच्या धर्तीवर आपल्या देशांमध्यें नवीन संस्था व कारखाने स्थापन करितील व पर्यायानें देशाची औद्योगिक प्रगति करण्याचें श्रेय संपादन करितील, अशी आशा आहे.

डेन्मार्कमधील शेतकीसंबंधीं मागील प्रकरणांत विस्तृत माहिती दिलेली आहे. हिंदुस्थान देश फक्त शेतकीवर अवलंबून असल्यानें, शेतीची सुधारणा होण्याची विशेष अवश्यकता आहे. आपल्या शिक्षण संस्थांमध्यें शेतकी हा विषय दाखल करून शेतकीच्या ज्ञानाचा प्रसार सर्वत्र केला पाहिजे. ॲग्रिकल्चर कॉलेजसारख्या इंग्रजी भाषाद्वारें शिक्षण देणाऱ्या संस्थानींच काम भागावयाचें नाहीं. तर देशामध्यें सर्वत्र ठिकठिकाणीं अशा संस्था स्थापन करून मातृभाषेच्या द्वारें शेतकीच्या शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे. पाश्चात्य देशांमध्यें जेथें शास्त्रीय पद्धतीवर शेती करण्यांत येते, तेथें पिकांची पैदास जास्त होते. शास्त्रीय पद्धतीचीं आउतें, चांगलें खत, इत्यादिकांचा जेणेंकरून अधिक उपयोग लोक करूं लागतील, अशा प्रकारचें ज्ञान सर्वांना अवश्य मिळालें पाहिजे. अमेरिकेसारख्या नवीन देशांतील जमिनीमध्यें अद्यापि जरी चांगला कस आहे, तरी तेथेंही शास्त्रीय पद्धतीप्रमाणें तयार केलेल्या खतांचा उपयोग करण्यांत येतो. तेव्हां आपल्या येथें-जेथें पुष्कळ वर्षांच्या वापरण्यामुळें जमीन निकस झाली आहे, तेथें

शास्त्रीय पद्धतीवर शेती करून लोक खतांचा बरोबर उपयोग करूं शकतील अशा प्रकारचा उपक्रम करावयास नको काय? या बाबतींत डेन्मार्क देशामध्यें तेथील सरकारानें शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां योजिलेल्या उपायांचें अनुकरण आपल्या देशांत होणें अगत्याचें आहे. सहकारी मंडळ्यांनीं आपल्या देशांत केलेलें कार्य अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे म्हटल्यास चालेल. ठिकठिकाणीं सहकारी मंडळें स्थापन होऊन त्यांच्या मार्फत शेतीसंबंधींचें सर्व काम होण्याची सोय झाली पाहिजे. शेतकऱ्यांना हलक्या व्याजानें पैसे मिळावेत म्हणून शेतकऱ्यांच्या बँकांची लहानमोठ्या गांवांमध्यें स्थापना झाली पाहिजे. हॉलंड देशाच्या वर्णनामध्यें ज्या बाजारपद्धतीची माहिती दिली आहे. त्या पद्धतीनें आपल्या देशांतील शेतकऱ्यांचा माल विकला जाण्याची व्यवस्था होणें अगत्याचें आहे. शेतकीच्या शिक्षणामध्यें शारीरिक व मर्दानी खेळांचा समावेश अवश्य झाला पाहिजे. थकल्या भागलेल्या श्रांत मनास करमणूक वाटून काम करण्यास उत्सुक करण्याकरितां शारीरिक मर्दानी खेळांची मनुष्यास आवश्यकता

असल्यामुळें, पाश्चात्य देशांमध्यें या बाबतीकडे विशेष लक्ष देण्यांत येतें, तसें आपणहि केलें पाहिजे. दक्षिणेमधील लोक कुस्त्या, दांडपट्टा खेळतात, ते खेळ कायम राखून विशेषतः गुजराथसारख्या ज्या भागांमध्यें शारीरिक शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यांत येतें, तेथें शारीरिक शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला पाहिजे. सणाचे वेळीं किंवा दुसऱ्या अशाच आनंदाचे प्रसंगीं पाश्चात्य देशांमध्यें ज्याप्रमाणें लोक आनंदोत्सवामध्यें व खेळण्याबागडण्यामध्यें वेळ खर्च करून श्रांत आणि त्रस्त झालेल्या मनास उल्हसित करितात, त्याचप्रमाणें आपल्या इकडेहि झालें पाहिजे. हरिकीर्तन आणि भजनासारख्या पद्धति मोडून न टाकितां त्या कायम ठेविल्या पाहिजेत. कारण, गरीब व अज्ञान लोकांना एकत्र जमून ज्ञान मिळविण्याचा तो एक मार्ग आहे. देशामधील जुन्या वस्तु, त्याचप्रमाणें जगांतील नवीन वस्तु शेतकरी लोकांना सहज पाहावयास मिळूं शकतील अशी व्यवस्था ठिकठिकाणीं झाली पाहिजे व प्राचीन वस्तूंचा किंवा इमारतींचा नाश न करितां त्या जतन करून ठेविल्या पाहिजेत. मातृभाषेमध्यें लिहिलेले

लेख वगैरेंच्या द्वारें जगाच्या चालू परिस्थितीकडे उत्कंठा-पूर्वक पाहण्याची त्यांच्यामध्यें, अभिरूची उत्पन्न होईल अशी तजवीज केली पाहिजे. कारण, तसें झालें म्हणजे जगाकडे उदासीनवृत्तीनें पाहण्याची लोकांची संवय आपोआप नाहींशी होईल. पाश्चात्य राष्ट्रांमध्यें वरील-पद्धति अस्तित्वांत असल्याकारणानें लोकांमध्यें चालू स्थितीबद्दल औदासीन्य दिसून येत नाहीं.

वर सांगितलेलीं कामें चांगल्या यशस्वी रीतीनें पार पाडण्याकरितां सरकारी साहाय्याची खास जरूर असल्या-कारणानें सरकारचें साहाय्य मिळविण्याची यवस्था देशांतील पुढारी मंडळीनें केली पाहिजे. कोणत्याही गोष्टीचें अनुकरण करण्यापूर्वी " West is best " पाश्चात्य तितकें उदात्त अथवा " Old is gold " जुनें तें सोनें या दोहोंपैकीं एकहि मताचा अंगिकार न करितां निःपक्ष-पातबुद्धीनें वर्तमान परिस्थितीस अनुसरून, ज्या मार्गांनीं आपली उन्नति होईल—मग ते मार्ग पौर्वात्य असोत अगर पाश्चात्य असोत—त्या मार्गांचें अवलंबन

आपण केलें पाहिजे. अनुकरण करतेवेळीं बाह्य देखाव्यास न भाळतां रहस्यभूत तत्वांचा अंगिकार केल्यास पुरें आहे. नाहींतर बाह्य देखाव्याकडे विशेष लक्ष दिल्यामुळें, मुख्य तत्त्वांकडे दुर्लक्ष होण्याचा संभव असतो.

" प्रजाः प्रजाः स्वा इव तंत्रयित्वा " या उक्तीप्रमाणें स्वतःच्या कृतीनें खरें प्रजावात्सल्य दाखवून ज्यांनीं आपल्या राज्यांत उपयुक्त अशा अनेक सुधारणा करून प्रजेला सुखी आणि कार्यक्षम केलें आणि अद्यापिहि ज्यांचे त्याच धोरणानें अहर्निश प्रयत्न चालू आहेत, त्या पुण्यश्लोक **श्रीमंत सरकार सयाजीराव महाराजगायकवाड** यांनीं उपरिनिर्दिष्ट पुष्कळ सुधारणा आपल्या बडोदें राज्यामध्यें करून, बडोद्याचें नांव सर्व सुधारलेल्या देशांमध्यें सुविख्यात केल्यामुळें सर्वांकडून बडोदें राज्यास " मॉडेल स्टेट " (नमुना घेण्यासारखें राज्य) म्हणवून घेण्याचा बहुमान ज्यांनीं संपादन केला, त्यांच्यासंबंधीं फक्त बडोदें राज्यांतील प्रजाजनांसच नव्हे, तर सर्व हिंदी बंधूंना धन्यता वाटत असल्यास आश्चर्य नाहीं. आम्हांसही त्यांच्याच

औदार्य आणि कृपाप्रसादानें देशपर्यटनाचें श्रेय मिळून विशेष ज्ञानार्जन करण्याची संधि मिळाली. ह्या मिळवि- लेल्या ज्ञानाचा उपयोग राज्यास आणि प्रजाजनांस होण्याचें प्रभूच्या स्वाधीन असल्यानें जगन्नियंता सर्वेच्छा परिपूर्ण करणार समर्थ आहे. शेवटीं श्रीमंत सरकार महाराज साहेबांना सहकुटुंब आयुरारोग्य देऊन दीर्घायु करो, अशी त्या जगन्नायकाच्या चरणारविंदिं अनन्यभावें प्रार्थना करून हें छोटेखानी प्रवासवृत्त पुरें करितों.

समाप्त

上
13